सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ०५ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

गोविंदा रे गोपाळा! ठाण्यात दहीहंडीची धूम; सुरक्षेच्या कवचासह कोट्यवधींच्या बक्षिसांसाठी अटीतटीची लढत

ठाणे : ठाणे शहर पुन्हा एकदा उत्सव आणि साहसाच्या अनोख्या संगमासाठी पूर्णपणे तयार झाले आहे. शनिवारी, ५ सप्टेंबर रोजी ठाण्यात भव्य दहीहंडी उत्सव साजरा केला जाणार असून, उंचच्या उंच मानवी मनोरे रचणाऱ्या गोविंदा पथकांसाठी आयोजकांनी लाखो रुपयांच्या भरघोस बक्षिसांची खैरात केली आहे. काळाच्या ओघात बाळकृष्णाच्या बाललीलांचे प्रतीक असलेला हा पारंपरिक सण आता एका मोठ्या आणि अटीतटीच्या क्रीडा प्रकारात बदलला आहे. आजकाल गोविंदा पथके ९ ते १० थरांचे मानवी मनोरे रचून विक्रम प्रस्थापित करताना दिसतात. ठाण्यातील प्रमुख राजकीय नेते आणि स्थानिक संस्था या भव्य उत्सवांचे मुख्य प्रायोजक आहेत.

ठाण्यातील प्रमुख आयोजनांपैकी एक म्हणजे आमदार शिवाजीराव पाटील यांच्या स्वामी प्रतिष्ठानतर्फे पाचपाखाडी आणि हिरानंदानी मेडोज येथे आयोजित करण्यात आलेली दहीहंडी. या हंडीसाठी तब्बल ७१ लाख रुपयांचे एकूण पारितोषिक ठेवण्यात आले आहे. बक्षिसांसोबतच गोविंदांच्या सुरक्षेसाठी सेफ्टी हार्नेस आणि विमा कवचही देण्यात आले आहे. "आम्ही केवळ खेळाडूंच्या कौशल्याचे आणि कष्टांचे बक्षीस देऊन थांबत नाही, तर आंतरराष्ट्रीय दर्जाची सुरक्षा साधने, प्रोफेशनल हार्नेस सिस्टीम आणि पूर्ण विमा कवच देत आहोत, जेणेकरून प्रत्येक गोविंदा आत्मविश्वासाने आणि सुरक्षितपणे खेळू शकेल," असे आमदार पाटील यांनी सांगितले.

दुसरीकडे कॅसल मिल येथील उपमहापौर कृष्णा पाटील (Krushna Patil) यांच्या गोकुळ दहीहंडीने अव्वल कामगिरी करणाऱ्या पथकांसाठी ५५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. तसेच वर्तक नगर येथे आमदार प्रताप सरनाईक (Pratap Sarnaik) यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानची दहीहंडी २१ लाख ते ५१ लाख रुपयांच्या बक्षिसांसह सज्ज झाली आहे. हे ठिकाण जागतिक विक्रम रचण्याचा प्रयत्न करणाऱ्या पथकांसाठी मुख्य केंद्र बनले आहे. "दहीहंडी हा आता महाराष्ट्रातील एक मान्यताप्राप्त साहसी खेळ बनला आहे. आपल्या तरुण गोविंदा पथकांची शिस्त, अचूकता आणि एकजूट याच्या बळावर ठाण्यात नवनवे जागतिक विक्रम रचले जातात, याचा आम्हाला प्रचंड अभिमान आहे," असे आमदार प्रताप सरनाईक यांनी आवर्जून नमूद केले. रहेजा पार्क येथे संकल्प प्रतिष्ठानच्या वतीने दहीहंडीचे २१ वे वर्ष साजरे केले जात आहे. आमदार रवींद्र फाटक यांनी जागतिक विक्रम मोडणाऱ्या कोणत्याही पथकाला २१ लाख रुपयांचे विशेष बक्षीस जाहीर केले असून महिला गोविंदा पथकांसाठीही स्वतंत्र रोख बक्षिसे ठेवली आहेत.

दिवंगत शिवसेना नेते आनंद दिघे (Anand Dighe) यांच्या समर्थकांनी आयोजित केलेली टेंभी नाक्याची मानचा गणला जाणारा हंडी उत्सव ११ लाख ते २५ लाख रुपयांहून अधिकच्या बक्षिसांसह सज्ज आहे. ठाण्यातील सर्वात जुन्या आणि पहिल्या मोठ्या दहीहंडी आयोजनांपैकी ही एक मानली जाते. याशिवाय आमदार जितेंद्र आव्हाड (पाचपाखाडी) आणि अविनाश जाधव (नौपाडा) यांच्या दहीहंडी आयोजनांमध्येही प्रत्येकी ११ लाख ते २५ लाख रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. मोठमोठ्या आणि हायप्रोफाइल आयोजनांसोबतच सामाजिक भान जपत बाळकुम आणि नौपाडा येथे विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) मुलांसाठीही विशेष दहीहंडी उत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, कायदा, सुव्यवस्था आणि गर्दीचे नियोजन योग्य प्रकारे व्हावे यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयाने शहरात एकूण २५४ सार्वजनिक दहीहंडी आयोजनांना मंजुरी दिली आहे.

मुसळधार पावसाने दिल्ली विमानतळ पाण्याखाली!

टर्मिनलवर साचले पाणी, प्रवाशांचे हाल अन् IMD कडून 'यलो अलर्ट' जारी

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, त्याचा मोठा फटका दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाला (IGI Airport) बसला आहे. पावसानंतर विमानतळाच्या प्रवेशद्वाराबाहेर मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याचे समोर आले आहे. जमिनीवर साचलेल्या पाण्यात प्रकाशाचे किरण परावर्तित होत असल्याचे दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले असून, या पाण्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

प्रवाशांचे हाल; ट्रॉली ढकलत अन् पायजमा दुमडून करावा लागला प्रवास

विमानतळ परिसरात साचलेल्या पाण्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली. अनेक प्रवासी पेंट/पायजमा दुमडून पाण्याच्या मधूनच आपल्या ट्रॉली ढकलत ॲराइव्हल (Arrival) गेट्सच्या दिशेने जाताना दिसले. "मी गेल्या अर्ध्या तासापासून येथे उभी आहे आणि पाणी थोडे ओसरण्याची वाट पाहत आहे. असा प्रकार मी यापूर्वी कधीच पाहिला नव्हता," अशी प्रतिक्रिया मानसी आणि हिमांशी या महिला प्रवाशांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. कृष्ण जन्माष्टमीच्या सणादरम्यानच पाऊस पडल्याने प्रवाशांची धावपळ अधिकच वाढली.

हवामान विभागाची (IMD) आकडेवारी अन् पावसाची नोंद

भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) दिलेल्या ३ तासांच्या आकडेवारीनुसार, दिल्लीतील पालम भागात सकाळी ११.३० ते दुपारी २.३० दरम्यान ३.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर नजफगड परिसरात सकाळी ८.३० ते ११.३० दरम्यान ०.५ मिमी पाऊस पडला. दिल्लीतील इतर बहुतांश केंद्रांवर या कालावधीत पाऊस पडला नसला तरी, अचानक आलेल्या मुसळधार सरिमुळे सकल भागांत पाणी साचण्यास सुरुवात झाली.

दिल्लीला 'यलो अलर्ट'; वाहतूक कोंडीची शक्यता

विमानतळासह दिल्लीतील सखल भाग आणि अंडरपासमध्ये पाणी साचल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर हवामान विभागाने संपूर्ण दिल्लीसाठी 'यलो अलर्ट' (Yellow Alert) जारी केला आहे. पावसामुळे रस्ते वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून, सार्वजनिक वाहतूक सेवेलाही विलंब होत आहे. नागरिकांनी आणि प्रवाशांनी प्रवासाला निघण्यापूर्वी वाहतुकीचे अपडेट्स तपासावेत, तसेच विजांच्या कडकडाटादरम्यान विजेचे खांब व तारांपासून दूर राहावे, असा सल्ला प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

पुढील काही तास महत्त्वाचे; ६० किमी वेगाने वारे वाहणार

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, दिल्ली आणि आसपासच्या परिसरात पुढील काही तासांत मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. काही भागांत ५० ते १०० मिमी पाऊस पडू शकतो. या काळात ताशी ४० ते ५० किमी वेगाने, तर काही वेळा ताशी ६० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयात 'कर्मचारी समाधान शिबिर' संपन्न

शिबिरात एकूण 14 तक्रार अर्ज दाखल

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ :- विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली आज विभागीय आयुक्त कार्यालयात 'कर्मचारी समाधान शिबिर' पार पडले. या शिबिरात एकूण १४ तक्रार अर्ज दाखल झाले. शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक समस्यांचे संबंधित विभागांनी तातडीने निराकरण करावे आणि आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले.

विभागीय आयुक्तांच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास सहआयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या शिबिरात महसूल शाखेशी संबंधित ११, नगर परिषदेशी संबंधित ०१, विकास आस्थापनेशी संबंधित ०१ आणि नियोजन शाखेशी संबंधित ०१, असे एकूण १४ तक्रार अर्ज दाखल झाले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या पुढाकाराने संपूर्ण विभागात दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबिर' आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत आजचे शिबिर आयोजित करण्यात आले. विविध विभागांतील कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यावेळी आपल्या तक्रारी मांडल्या. या शिबिराच्या माध्यमातून त्यांच्या समस्यांची तात्काळ दखल घेऊन संबंधित प्रकरणांवर योग्य ती कार्यवाही करण्यात आली.

मराठवाड्यातील क्रीडा संकुले आधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्यासाठी पाठपुरावा करा – विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

दर सोमवारीक्रीडा संकुल परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (विमाका) :-* मराठवाड्यातील खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच ऑलिम्पिकसारख्या प्रतिष्ठेच्या स्पर्धांसाठी सक्षम करण्याच्या दृष्टीने विभागातील सर्व विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील क्रीडा संकुले आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि उच्च दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज करावीत. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन सर्वंकष विकास आराखडा तयार करून त्याचा नियमित पाठपुरावा करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले. क्रीडा संकुलांच्या विकासासाठी येणाऱ्या अडचणींचे विभागीय पातळीवर तातडीने निराकरण करण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

विभागीय आयुक्त कार्यालयातील त्यांच्या दालनात मराठवाड्यातील विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील क्रीडा संकुलांचे अद्ययावतीकरण, क्रीडा संकुलांसाठी आवश्यक असलेली जमीन, उपलब्ध निधीचा विनियोग आणि अतिरिक्त निधीची मागणी याबाबत विभागातील आठही जिल्ह्यांच्या जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजीनगर क्रीडा विभागाचे विभागीय उपसंचालक शेखर पाटील, लातूर क्रीडा विभागाचे विभागीय उपसंचालक मिलिंद दीक्षित, जालना जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, बीडचे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, धाराशिवच्या जिल्हा क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर, नांदेडचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी, लातूरचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंडे, परभणीचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी कल्याण पोले, हिंगोलीचे प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर उपस्थित होते.

जी. श्रीकांत म्हणाले की, प्रत्येक जिल्ह्यात विविध खेळांतील उत्कृष्ट खेळाडू घडविण्यासाठी स्थानिक स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे नियमित आयोजन झाले पाहिजे. खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे सिंथेटिक ट्रॅक उभारण्यास प्राधान्य द्यावे. ज्या जिल्ह्यांत अद्याप सिंथेटिक ट्रॅक उपलब्ध नाही, त्यांनी सिंथेटिक ट्रॅक उभारण्यासाठी तातडीने विकास आराखडा सादर करावा. क्रीडा संकुलांसाठी आवश्यक जमीन उपलब्ध नसलेल्या ठिकाणीही जिल्हा पातळीवर प्रस्ताव सादर करून त्याचा नियमित पाठपुरावा करावा.

तरुण पिढीला सकारात्मक दिशा देण्यासाठी आणि त्यांच्यातील खिलाडूवृत्तीला प्रोत्साहन देणारे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विविध खेळांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची मैदाने विकसित करण्यासोबतच क्रीडा संकुलांच्या भविष्यातील विस्तारासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

क्रीडा संकुलांच्या विकासाचे नियोजन करताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) प्रभावी वापर करून प्राधान्यक्रम निश्चित करावेत. आधुनिक बाबींचा समावेश असलेला उच्च दर्जाचा आराखडा वास्तुविशारदांकडून तयार करून आवश्यक निधीसाठी येत्या दहा दिवसांत प्रस्ताव सादर करावेत. प्रस्तावित निधी विविध स्रोतांतून लवकर उपलब्ध होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित पाठपुरावा करावा. यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागाच्या विभागीय क्रीडा उपसंचालकांनी विभागीय स्तरावर समन्वय साधावा. निधी उपलब्धतेबाबत अडचणी आल्यास त्या सोडविण्यासाठी स्वतः प्रयत्न करणार असल्याचेही विभागीय आयुक्तांनी सांगितले.

सुरू असलेल्या कामांची ड्रोनद्वारे पाहणी :-

सध्या प्रगतिपथावर असलेल्या क्रीडा संकुलांच्या कामांची ड्रोनद्वारे पाहणी करून कामांची छायाचित्रे व व्हिडिओ संकलित करावेत आणि त्याआधारे प्रगती अहवाल वेळेत सादर करावा.

आ. भुमरेंच्या जनता दरबारात अधिकाऱ्यांची कानउघडणी

तभा वृत्तसेवा पैठण दि ०४ :- पैठण तालुक्यातील शेतकरी तथा नागरिकांचे शासन दरबारी दिरंगाईने होत असलेल्या कामाबद्दल तालुक्याचे आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी तहसील कार्यालय सभागृहात अधिकाऱ्यांच्या उपस्थित जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार भुमरे यांनी शेतकऱ्यांच्या समस्या ऐकल्यावर काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांना काम करा अथवा बदलीचा प्रस्ताव पाठवा अशी कानउघडणी केली.

तहसील कार्यालय सभागृहात आयोजित या जनता दरबारा प्रसंगी आमदार विलास बाप्पू भुमरे, एस.डी. एम नीलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी पाटील,उप जिल्हा प्रमुख विनोद बोंबले, नंदलाल काळे,भूषण कावसणकर, उप नगराध्यक्ष तुषार पाटील,सां.बां. विभागाचे उप कार्यकारी अभियंता राजेंद्र बोरकर,कारखाण्याचे संचालक अप्पासाहेब निर्मळ,बिडीओ मानोरमा गयकवाड, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे,स्वीय सहाय्यक सतीश अंधारे, अनिकेत धारकर, नगरसेवक राजू गायकवाड, गणेश वरकड, रमेश वीर,सुनील हिंगे आदींसह बिडकीन, पाचोड, पैठण एम.आय.डी.सी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तसेच विविध शासकीय विभागाचे अधिकारी कर्मचारी यांची उपास्थिती होती.

जनता दरबारात आमदार भुमरे यांनी महसूल प्रमाणपत्रे, पुरवठा विभाग,रोजगार हमी, रेशम अनुदान, तालुक्यातील अवैध धंदे, अवैध वाळू उपसा,शेत रस्ता,गांव रस्ता मोजणी,घरकुल, शेतकरी आत्महत्या, जात प्रमाणपत्र, स्वछता,बळीराजा पानंद योजना,नवगांव स्मशानभूमी,पिंपळवाडी प्लॅट खरेदी फेरफार,पैठण शहरातील पाणीपुरवठा,सिसिटीव्ही,क्रीडा ट्रक,वन विभाग रस्ता,कृषी विभागाच्या वतीने शेतकरी मार्गदर्शन,पीकविमा,फळबाग योजना,शेतकरी मित्र,पीएम किसान,कुत्रिम पाऊस, पोर्टलवर गावांच्या नावात बदल,जिप शाळा वर्ग खोल्या, दुरुस्ती, शौचालय,अभ्यासिका,राहाटगांव, थेरगांव,शेतीवर अतिक्रमण,विहामांडवा पोलीस चौकी हद्द प्रश्न,महावितरण योजना,सुरु असलेली कामे अश्या विविध बाबींचा आढावा घेत कामे करत नसलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई बाबत सूचना करण्याच्या सूचना दिल्या तसेच पैसे घेऊन काम करणाऱ्या अधिकाऱ्याला नागरिकांचे पैसे परत कर नसता काम सोड असा सज्जड दम दिला. महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी पैठणला जनता दरबार भरेल असे यावेळी आमदार भुमरे म्हणाले.संदीप मडके, राजू मापारी, मनीष औटे,सुरज नागोरी,ऋषी दहिभाते पप्पू खोचे,,बाबा घटे, ऋषीं अय्यर, गजू इच्छय्या सह यावेळी जिप, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उप सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, लोकप्रतिनिधी, पाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठया संख्येने उपस्तित होते.

एआय प्लस चा 'नेक्स्ट क्वांटम ओएस 1.1'सादर

मुंबई - एआय प्लस स्मार्टफोनने 'नेक्स्ट क्वांटम ओएस'ची आवृत्ती १.१ सादर केली असून, या नव्या आवृत्तीत गोपनीयता संरक्षणाची चौकट अधिक मजबूत करण्यात आली आहे. तसेच, ॲप्लिकेशन्सना वापरकर्त्यांच्या उपकरणांवरील संसाधने आणि डेटाचा वापर कसा करता येतो, याबाबत अधिक पारदर्शकता आणि नियंत्रण वापरकर्त्यांना मिळणार आहे. डेटा सार्वभौमत्व आणि सुरक्षिततेच्या बांधिलकीचा भाग म्हणून 'नेक्स्ट क्वांटम'मध्ये कठोर 'सॉव्हरिन डेटा बाउंड्री' लागू करण्यात आली आहे. त्यामुळे ॲप्लिकेशन्समधून होणारी १०० टक्के डेटा वाहतूक भारतातच उपलब्ध असलेल्या आणि भारतात होस्ट केलेल्या पायाभूत सुविधांमधून केली जाते. परिमिती सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी या प्रणालीद्वारे १,००० हून अधिक कनेक्शन्स आणि १७२ स्वतंत्र गंतव्य आयपींच्या सोर्स नियमांचे स्वयंचलित विश्लेषण केले जाते. विशेष म्हणजे, सर्व डेटा वाहतूक आणि आयपी पिंग्ज भारताच्या हद्दीतच मर्यादित राहतात. केवळ ऑपरेटिंग सिस्टमच्या आवश्यक मूलभूत कार्यांसाठी आवश्यक असलेली गुगलची काही कोअर सेवा कॅलिफोर्निया आणि सिंगापूरकडे निर्देशित केली जाते. या माध्यमातून डेटा अखंडतेला प्राधान्य देतानाच 'नेक्स्ट क्वांटम ओएस'च्या चौकटीशी सुसंगतपणे वापरकर्त्यांच्या माहितीचे संरक्षण करण्याच्या बांधिलकीला अधिक बळकटी दिली जाते.

विवोने दमदार परफॉर्मन्ससह टी5 लाँच केला

मुंबई - विवो इंडियाने आज त्यांच्या परफॉर्मन्स-आधारित सिरीज-टी पोर्टफोलिओमध्ये नवीन भर म्हणून विवो टी5 लाँच करण्याची घोषणा केली. हा फोन अशा महत्त्वाकांक्षी तरुणांसाठी डिझाइन केला आहे ज्यांना दमदार परफॉर्मन्स, प्रीमियम डिझाइन आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी हवी आहे. विवो टी5 मध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी 7500 टर्बो प्रोसेसरसह नवीनतम पिढीचे एआय-रेडी एनपीयू इंजिन आहे, जे डिव्हाइसवर 233% अधिक वेगाने एआय निर्मिती करते. यात मोठी 7050 एमएएच बॅटरी आणि 17.35 सेमी (6.83-इंच) १.५के १४४हर्ट्झ ३डी कर्व्हड अमोलेड डिस्प्ले आहे, आणि हे सर्व एका स्लिम आणि हलक्या वजनाच्या फॉर्म फॅक्टरमध्ये आहे. जे नवनवीन शोध लावतात आणि सतत प्रवासात असतात, त्यांच्यासाठी बनवलेला विवो T5 स्मार्टफोनच्या परफॉर्मन्सची एक नवीन व्याख्या करतो. सर्वसाधारण कामगिरीच्या मानदंडांच्या पलीकडे जाऊन, यात शक्तिशाली हार्डवेअर, एक वैशिष्ट्यपूर्ण नवीन डिझाइन लँग्वेज, बुद्धिमान एआय क्षमता आणि एक बहुपयोगी कॅमेरा सिस्टीम यांचा मिलाफ आहे, ज्यामुळे काम, निर्मिती, मनोरंजन आणि दैनंदिन कामांसाठी अनुकूल असा अधिक समग्र स्मार्टफोन अनुभव मिळतो.

रिकामे कंटेनर यार्डचे कामकाज सुरू करणार

छत्रपती संभाजीनगर : : भारतातील सर्वात मोठी एकात्मिक वाहतूक सेवा देणारी कंपनी अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड) चा आर्थिक वर्ष 2026 मध्ये भारतातील कंटेनर बाजारात 45.5 टक्के वाटा आहे. यामध्ये मुंद्रा पोर्टचा एकट्याचा वाटा जवळपास 35 टक्के आहे. त्यामुळे मुंद्रा हे भारतातील सर्वात मोठे कंटेनर हाताळणारे बंदर ठरले आहे. मुंद्रा बंदरावर दरवर्षी सुमारे 16 लाख टीईयू रिकामे कंटेनर हाताळले जातात. यावरून भारताच्या आयात-निर्यात पुरवठा साखळीला मदत करण्यात मुंद्रा पोर्टची महत्त्वाची भूमिका स्पष्ट होते.

जेन झेड च्या सर्व 'वेदनां'साठी अनडू विथ झंडू

छत्रपती संभाजीनगर : तुम्ही अशा पिढीचा विश्वास कसा जिंकाल जी जाहिराती स्किप करते, कोणतीही बनावट गोष्ट ओळखते आणि वेदना सहन करण्यास नकार देते? ईमामी लिमिटेडच्या परिवारातील झंडु बाम कडून, उत्तर साधे आहे: जेन झेड ला उपदेश देऊ नका. त्यांच्याशी त्यांना आवडणाऱ्या पद्धतीने बोला.या नवीन कॅम्पेनमधे अनडू विथ झंडू भारताचा नंबर 1 वेदना निवारक बाम, जेन झेड च्या दृष्टिकोनातून वेदना समजून घेण्याचा प्रयत्न करते. स्क्रीन पाहण्यातून होणारी डोकेदुखी आणि मानदुखी, डूमस्क्रोलिंगमुळे थकवा आणि दैनंदिन त्रास या आजच्या तरूण ग्राहकांना लगेच ओळखता येईल अशा "वेदना" दाखवल्या जातात.

भारतातील नव्या पिढीच्या प्रवाशांसाठी संयुक्त-ब्रँडेड क्रेडिट कार्ड सादर

पुणे : भारतातील आघाडीची ट्रॅव्हल फिनटेक कंपनी स्कॅपिया आणि भारतातील आघाडीच्या खासगी क्षेत्रातील बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेने आज स्कॅपिया ॲक्सिस बँक क्रेडिट कार्ड सादर केले. भारतातील नव्या पिढीच्या प्रवाशांना लक्षात घेऊन हे कार्ड डिझाइन करण्यात आले असून, प्रत्येक खर्चाला त्यांच्या पुढील प्रवासाकडे नेणारे एक पाऊल मानले आहे. हे कार्ड पेमेंट्स, रिवॉर्ड्स आणि प्रवासाचा अनुभव एका एकत्रित डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणते. स्कॅपिया ॲपच्या माध्यमातून ग्राहकांना खर्चाचे व्यवस्थापन व ट्रॅकिंग, प्रवासाचे बुकिंग तसेच रिवॉर्ड्सचे रिडेम्पशन करता येते. पात्र कार्ड खर्च आणि यूपीआय व्यवहारांवर रिवॉर्ड्स मिळतात. हे रिवॉर्ड्स फ्लाइट्स, हॉटेल स्टे, अनुभव, खरेदी आणि इतर प्रवासाशी संबंधित सुविधांसाठी वापरता येतात.

केजमध्ये आदर्श शिक्षकांचा होणार गौरव

केज दि ४(प्रतिनिधी) : शिक्षक दिनाचे औचित्य साधून केज येथे श्री.रमाकांत बापू मुंडे यांच्या 'अभिष्टचिंतन दिनी आदर्श शिक्षक सन्मान सोहळा आयोजित केला आहे. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आदर्श शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच संस्कार, सामाजिक जाणीव, नवोपक्रम आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव या माध्यमातून केला जाणार आहे. शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत हा सोहळा होणार आहे. आदर्श शिक्षक हनुमंत भोसले, डॉ हनुमंत सौदागर, मुल्ला समद बशीर, भगवत सोनवणे अनंत जाधवर सतिष देशमूख यांचा सन्मान करण्यात येणार आहे. विशेष सत्कारमूर्ती म्हणून श्री.विठ्ठलराव व्यंकटराव जाधवर श्री.डॉ. विलास शेषेराव नागरगोजे श्री.दादाराव विठ्ठल जाधवर तसेच ह.भ.प. श्री. महंत भगवान महाराज वरपगावकर, ह.भ.प. श्री.केशव महाराज सारुक शास्त्री तसेच ह.भ.प. श्री. केशव महाराज घुले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

रिपाइं पदाधिकाऱ्यांची दि.8 सप्टेंबर रोजी महत्वपूर्ण बैठक-आयोजित:राजू जोगदंड

बीड / प्रतिनिधी : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने राज्यभर समता मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. समता मार्च रॅलीच्या अनुषंगाने केंद्रीयमंत्री रामदास आठवले हे दि. 16 ऑक्टोबर 2026 शुक्रवार रोजी समता मार्च रॅलीसाठी बीड जिल्ह्यात येणार आहेत. रिपाइंच्या वतीने आयोजित समता मार्च रॅलीच्या पूर्वतयारीसाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाभरातील रिपाइं पदाधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक मंगळवार दि.8 मार्च 2026 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नगर रोड बीडच्या सभागृहात सकाळी ठीक 11 वाजता आयोजित करण्यात आली आहे.तरी रिपाइंच्या जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, जिल्हा भरातील तालुका कार्यकारिणी पदाधिकारी, महिला आघाडी पदाधिकारी, युवा रिपाइं पदाधिकारी, शहर कार्यकारिणी पदाधिकारी, यांनी दि. ८ सप्टेंबर 2026 मंगळवार रोजी आंबेडकर भवनाच्या सभागृहात सकाळी ठीक 11 वाजता आयोजित बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे. असे आवाहन रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी केले आहे.

आसमानी संकटांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले; आता प्रशासनाचे सुलतानी संकट नको - अशोक लोढा

बोरखेड, चौसाळा परिसरात पिकांची प्रत्यक्ष पाहणी; तातडीने पंचनामे करुन नुकसानभरपाई देण्याची मागणी

चौसाळा, दि. ३ : पावसाने ओढ दिल्याने चौसाळा परिसरातील खरीप हंगाम अडचणीत सापडला असून सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी पिकांवर पावसाअभावी संकट ओढवले आहे. पावसाची प्रतीक्षा करत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतातील जमिनीतील ओलावा कमी होत चालला असून अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे. काही शेतांमध्ये पिके पिवळी पडू लागली असून काही ठिकाणी पिके वाळण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली आहे.

या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य अशोक चांदमल लोढा यांनी बोरखेड, चौसाळा परिसरातील विविध शेतांमध्ये प्रत्यक्ष जाऊन पिकांची पाहणी केली. त्यांनी शेतातील पिकांची अवस्था, जमिनीतील ओलावा तसेच पावसाअभावी पिकांवर झालेला परिणाम जाणून घेतला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून पेरणीपासून आतापर्यंत झालेला खर्च, बियाणे, खते, औषधे, मशागत व मजुरीवर झालेला खर्च तसेच सध्याची पिकांची स्थिती आणि अपेक्षित उत्पादनाबाबत माहिती घेतली.

शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने आणि कर्ज काढून खरीप पिकांची पेरणी केली. मात्र, पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने दडी मारल्याने संपूर्ण हंगाम हातातून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत असताना पिकांचे

नुकसान झाल्यास त्यांच्या अडचणी आणखी वाढणार आहेत.

या पार्श्वभूमीवर अशोक लोढा यांनी महसूल व कृषी विभागाने तातडीने प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करावी आणि नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, अशी मागणी केली. "आसमानी संकटांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे; आता प्रशासनाचे सुलतानी संकट नको. कागदोपत्री पंचनामे न करता प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची अवस्था पाहावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीची योग्य नोंद करावी," असे अशोक लोढा यांनी स्पष्ट केले.

"शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून पिके उभी केली आहेत. पावसाअभावी त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने विलंब न करता पीक पाहणी व पंचनामे पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी. नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहता कामा नये, अशी मागणीही त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांच्या प्रश्नांसाठी शासन व प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, असेही लोढा यांनी सांगितले. पावसाची परिस्थिती आणि पिकांची झालेली अवस्था पाहता प्रशासनाने केवळ कार्यालयीन पातळीवर नोंदी न करता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून नुकसानीचा आढावा घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पाहणीदरम्यान जयसिंघ जाधव, भाऊसाहेब शिंदे, बिभीषण मुळे, सलीम कुरेशी, बंडू कवडे, अंगद शिंदे, रामचंद्र शिंदे, शहादेव हिंदोळे, सुनील अनपट, विशाल हिंदोळे, भरत महाराज, बाबूराव जगदाळे, शिवराज शिंदे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, सेवा सोसायटीचे चेअरमन तसेच गावातील युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून प्रशासनाने तातडीने शेतपातळीवर पाहणी करून पंचनामे पूर्ण करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

कोर्ट सुरु असतानाच न्यायाधीशांना सक्तीची सेवानिवृत्ती

अंबाजोगाई : अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयात गुरुवारी कोर्ट सुरु असतानाच अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांना सक्तीची सेवानिवृत्ती देण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा न्यायाधीश बीड यांच्या पथकाने या आदेशाची अंमलबजावणी केली. या घटनेने न्यायालयीन वर्तुळात खळबळ माजली आहे. सुमारे १५ वर्षांपूर्वी देखील अंबाजोगाईच्या जिल्हा न्यायालयात अशीच एका न्यायाधीशांना सक्तीची सेवानिवृत्ती देण्यात आली होती.

न्यायालयीन कार्यपद्धतीमध्ये अपवादात्मक आणि न्यायालयीन शुचिता राखण्याच्या दृष्टिकोनातून केली जाणारी कारवाई म्हणून सक्तीच्या सेवानिवृत्तीकडे पाहिले जाते. गुरुवारी अंबाजोगाई जिल्हा न्यायालयात न्यायालयीन कामकाज सुरु असतानाच अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांच्या न्यायालयात प्रमुख जिल्हा न्यायाधीश बीड यांच्या पथकाने न्या. डॉ तेहरा यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या आदेशांची अंमलबजावणी केली. विशेष म्हणजे हे होण्यापूर्वी न्या. रचना तेहरा यांनी आगामी लोक अदालतीच्या संदर्भाने सर्व न्यायाधीश, भूसंपादन अधिकारी आणि संबंधितांची बैठक घेतली आणि त्यानंतर त्यांचे नियमित न्यायालयीन कामकाज सुरु होते. या घटनेने सर्वत्र खळबळ माजली आहे.

पंधरा वर्षांपूर्वीच्या आठवणी ताज्या

आज ज्या कक्षात न्या. रचना तेहरा यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीचे कारवाई करण्यात आली, त्याच कक्षात १५ वर्षांपूर्वी अशीच कारवाई करण्यात आली होती. तत्कालीन अतिरिक्त सत्र न्यायाधीशांना अशीच सक्तीची सेवानिवृत्ती देण्यात आली होती. या घटनेच्या अंबाजोगाईतील विधिज्ञांच्या आठवणी आज ताज्या झाल्या.

व्हॉट्सॲपवरील गृहपाठ पद्धत बंद करा: गोकुळाष्टमीच्या निमित्ताने नगरसेवक महेश लोमटे व 'गुड मॉर्निंग ग्रुप'ची आग्रही मागणी

अंबाजोगाई:

लहान मुलांचे वय हे मैदानी खेळ खेळण्याचे, बागडण्याचे आणि प्रत्यक्ष शिकण्याचे असते; मात्र ऑनलाईन गृहपाठाच्या नावाखाली त्यांच्या हातात सतत मोबाईल देऊन त्यांच्यातील निरागसता हिरावून घेतली जात आहे. त्यामुळे "विद्यार्थ्यांमधला बालकृष्ण मारू नका, शाळांमध्ये व्हॉट्सॲपवर गृहपाठ देण्याची पद्धत त्वरित बंद करा," अशी आग्रही मागणी गोकुळाष्टमीच्या निमित्ताने नगरसेवक महेश लोमटे आणि 'गुड मॉर्निंग ग्रुप'च्या वतीने पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

कोरोना काळात ऑनलाईन शिक्षण ही तात्कालिक गरज होती; परंतु आता शाळा पूर्ण क्षमतेने प्रत्यक्ष सुरू असतानाही शिक्षकांकडून वर्गात गृहपाठ न देता व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठवला जात आहे. या डिजिटल गृहपाठामुळे लहान मुले मैदानी खेळांपासून दुरावत असून, तासन्तास मोबाईलच्या स्क्रीनसमोर बसल्याने त्यांचे डोळे, मानसिक स्वास्थ्य आणि एकाग्रतेवर अत्यंत घातक परिणाम होत असल्याचे निवेदनात अधोरेखित

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची संवेदनशीलता; मुलींच्या शिक्षणासाठी अनवाणी पायाने धावणाऱ्या रमाबाईंचा जिल्हा प्रशासनाकडून सन्मान

बीड, दि. 4 (जिमाका) :- रमाताईंच्या विजयामागे केवळ स्पर्धा जिंकण्याची इच्छा नव्हती तर मुलींच्या शिक्षणासाठी संघर्ष करण्याची आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी आर्थिक मदत मिळविण्याची प्रबळ प्रेरणा होती. त्यामुळे त्यांचा हा विजय केवळ एका मॅरेथॉन स्पर्धेतील विजय न राहता आईच्या ममतेचा, त्यागाचा, संघर्षाचा आणि मातृत्वाच्या जिद्दीचा विजय ठरला आहे. त्यांच्या या प्रेरणादायी यशाची दखल जिल्हा प्रशासनानेही घेतली आहे. आपल्या मुलींच्या भविष्यासाठी एक आई किती कष्ट सोसू शकते, याचे रमाताई या मूर्तिमंत उदाहरण आहेत. असे भावनिक आणि गौरवास्पद उद्गार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी काढले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरांगे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी मनोज घोडे पाटील, उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महसूल अधिकारी व जिल्हा प्रशासनाच्यावतीने रमाबाई रणवीर यांचा यथोचित सन्मान करत 50 हजार रुपयांची रोख रक्कमेतून मदतीचा हात देण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पुढाकारातून मदत निधी संकलित करण्यात आला.

रमाताईंच्या दोन्ही मुलींच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत भविष्यात शिक्षणासाठी काही अडचण आल्यास आपण त्यांच्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभे असल्याची निःसंदिग्ध ग्वाही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली.

श्री गजानन नागरी सहकारी बँकेच्या शिरपेचात मानाचा तुरा; 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार 2026'ने गौरव

बीड : महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक फेडरेशन, मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२६' श्री गजानन नागरी सहकारी बँक लि., बीडला प्राप्त झाला आहे. बँकेच्या कार्याची दखल घेत मिळालेल्या या पुरस्कारामुळे बीडच्या सहकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. श्री गजानन नागरी सहकारी बँकेची मुहूर्तमेढ रोवताना स्व. केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू यांनी पाहिलेले सहकार आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक उन्नतीचे स्वप्न आज बँकेच्या यशस्वी वाटचालीतून साकार होताना दिसत आहे. त्यांच्या विचारांची आणि समाजाभिमुख कार्याची प्रेरणा बँकेच्या वाटचालीला कायम मार्गदर्शक ठरत आहे.बँकेचे अध्यक्ष माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बँक सातत्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. ग्राहकांचा विश्वास, पारदर्शक कारभार आणि गुणवत्तापूर्ण सेवा यामुळे बँकेने सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.या यशामागे बँकेचे अध्यक्ष उपाध्यक्ष व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, खातेदार, सभासद आणि ग्राहकांचे मोलाचे योगदान आहे. सर्वांच्या एकजुटीच्या प्रयत्नातून मिळालेला हा पुरस्कार बँकेशी जोडलेल्या प्रत्येक घटकाच्या विश्वासाचा सन्मान मानला जात आहे.स्व. केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू यांच्या समाजाभिमुख विचारांची प्रेरणा आणि जयदत्त क्षीरसागर यांच्या सक्षम मार्गदर्शनाची सांगड घालत श्री गजानन नागरी सहकारी बँक प्रगतीची नवी शिखरे गाठत आहे. मिळालेला 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२६' हा बँकेच्या पुढील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर, संचालक मंडळ,अधिकारी, कर्मचारी,खातेदार, सभासद आणि ग्राहकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

बीडमध्ये 6 सप्टेंबरला भव्य हृदयरोग तपासणी शिबिर; तज्ज्ञांकडून तपासणी व उपचार मार्गदर्शन

बीड (प्रतिनिधी) : जैन सोशल फेडरेशन, अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड यांच्या वतीने रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत भव्य हृदयरोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जालना रोड, शाहू बँकेजवळील आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे हे शिबिर होणार आहे.

या शिबिरासाठी बीडचे भूमिपुत्र, DNB (Cardiology) हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अमित भराडिया यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या माध्यमातून रुग्णांची हृदयरोग तपासणी करून आवश्यक उपचार तसेच पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

छातीत दुखणे, छाती जड होणे, दम लागणे, जास्त घाम येणे, चक्कर येणे, हृदयाची धडधड वाढणे आदी त्रास असलेल्या नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिबिरामध्ये अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, हृदयातील झडपा बदलणे, हृदयातील छिद्र बुजविणे तसेच आवश्यक हृदय उपचार व शस्त्रक्रियांबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. MJPJAY व PMJAY अंतर्गत पात्र रुग्णांना योजनेच्या नियमानुसार आवश्यक हृदयावरील उपचार व शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध होऊ शकतात. आर्थिक अडचणीमुळे उपचार घेण्यास विलंब करणाऱ्या पात्र रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

शिबिरातील विशेष शुल्क

तज्ज्ञ हृदयरोग डॉक्टरांची तपासणी व सल्ला – ₹२००

2D Echo – फक्त ₹९००

महिन्यातून दोनदा हृदयरोग तज्ज्ञांची सेवा

बीडकर नागरिकांच्या सोयीसाठी बीडचे भूमिपुत्र डॉ. अमित भराडिया यांची हृदयरोग तपासणी व मार्गदर्शन सेवा दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध राहणार आहे. हृदयाशी संबंधित कोणतीही लक्षणे असल्यास ती दुर्लक्षित न करता वेळेत तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. बीड शहरासह परिसरातील नागरिकांनी रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या विशेष शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

हरिनामाच्या गजरात बोरखेड दुमदुमले; अशोक लोढा यांनी दिली सभागृहाची ग्वाही

49 व्या अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता; महिला व युवकांची मोठी उपस्थिती

बोरखेड, दि. ३ : हरिनामाच्या गजराने आसमंत दुमदुमला, टाळ-मृदंगाच्या निनादाने वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले आणि संतविचारांनी भाविकांची मने प्रसन्न झाली. अशा भक्तिमय वातावरणात बोरखेड येथील ४९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली मंजिरीकर महाराज यांच्या काल्याच्या सुश्राव्य कीर्तनाने झाली. या सांगता सोहळ्यास चौसाळा जि. प. सदस्य अशोक लोढा यांची प्रमुख उपस्थिती होती.

सप्ताहाच्या सांगता सोहळ्यास गावातील महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सप्ताहभर विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होत असताना संपूर्ण परिसर भक्तिभावाने भारावून गेला. हरिनामाच्या जयघोषात भाविक तल्लीन झाले असून, या भक्तिमय वातावरणातून उपस्थितांना आध्यात्मिक समाधान, मानसिक सुख-शांती आणि आत्मिक आनंदाची अनुभूती मिळाली.

सप्ताहाच्या सांगता सोहळ्याच्या निमित्ताने ग्रामस्थांनी बोरखेड येथील हनुमान मंदिरासमोर सभागृह उभारण्याची मागणी अशोक लोढा यांच्याकडे मांडली. गावातील धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच सार्वजनिक कार्यक्रमांसाठी स्वतंत्र सभागृहाची आवश्यकता असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. ग्रामस्थांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत अशोक लोढा यांनी येत्या एका वर्षात शासनाकडून निधी उपलब्ध करून सभागृहाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली.

यावेळी अशोक लोढा म्हणाले, "अखंड हरिनाम सप्ताह ही केवळ धार्मिक परंपरा नसून समाजाला एकत्र आणणारी, संस्कारांची जपणूक करणारी आणि नव्या पिढीला संतपरंपरेशी जोडणारी चळवळ आहे. महिला व युवकांचा या सप्ताहातील उत्स्फूर्त सहभाग निश्चितच कौतुकास्पद आहे. ग्रामस्थांनी मांडलेली सभागृहाची मागणी रास्त असून ती पूर्ण करण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक पाठपुरावा केला जाईल."

अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून बोरखेडकरांनी भक्ती, संस्कार आणि सामाजिक एकोप्याची सुंदर वीण घातली. विशेषतः महिला आणि युवकांचा मोठ्या प्रमाणातील सहभाग हा सप्ताहाचे वैशिष्ट्य ठरले. हरिनामाच्या गजरात झालेल्या या सांगता सोहळ्याने गावातील भक्तिमय वातावरणाला अधिक उंची मिळाली असून, सामाजिक एकजूट आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याचा संदेश देणारा हा सोहळा ठरला.

नेत्रदानातून प्रकाश देणाऱ्यांचा सन्मान, प्रेरणादायी संवादातून नव्या पिढीला दिशा

अहिल्यानगर : दिशा एज्युकेशन फाउंडेशन व दिशा इंटरनॅशनल आय बँक यांच्या वतीने ५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता अभियंता भवन, शेगाव नाका, अमरावती येथे राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा २०२६ निमित्य दृष्टी ते दूरदृष्टी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

अमरावती जिल्हा मधील एकमेव धर्मदाय नेत्रपेढी दिशा इंटरनॅशनल आय बँक द्वारे या कार्यक्रमात नेत्रदान करणाऱ्या दिवंगत दात्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात येणार असून, त्यांच्या निःस्वार्थ योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार आहे. तसेच समाजात नेत्रदानाबाबत जनजागृती आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचा संदेश दिला जाणार आहे.

कार्यक्रमात श्री. प्रद्युम्न इंगळे, कंट्री प्रेसिडेंट व ग्लोबल हेड, हेनकेल (Henkel) आणि श्री. अमित वायकर, प्रेसिडेंट व सेल्स लीडर, आशिया, मोमेंटिव्ह (Momentive) सहभागी होणार आहेत. श्री अमित वाईकर यांना परदेशी भारतीयाला देण्यात येणारा सर्वोच पुरस्कार म्हणजे प्रवासी प्रवासी भारतीय सन्मान भारताचे मा. राष्ट्रपती यांच्या द्वारे देण्यात आलेला आहे. या दोन्ही पाहुण्यांची मुलाखत घेण्याकरिता मित्रम्हणे पॉडकास्टचे संस्थापक श्री. सौमित्र पोटे अमरावतीला येणार आहेत.

या संवादातून उपस्थितांना करिअर, नेतृत्व, संवादकौशल्य, जागतिक संधी, व्यावसायिक विकास आणि जीवनातील अनुभव याबाबत प्रेरणादायी विचार व मार्गदर्शन मिळणार आहे.

कार्यक्रमाचे तपशील:

- **दिनांक:** ५ सप्टेंबर २०२६
- **वेळ:** सायंकाळी ५ वाजता
- **स्थळ:** अभियंता भवन, शेगाव नाका, अमरावती

तरी जास्तीत जास्त लोकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

डीजे ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका घेणाऱ्या विद्यानंद बापट यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

हल्लेखोरावर कठोर कारवाईची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

अहिल्यानगर : सार्वजनिक उत्सवांमध्ये डीजे व लाऊडस्पीकरमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका मांडणारे पर्यावरणप्रेमी विद्यानंद बापट यांना पुण्यातील टिळक रोडवरील कशाळे चौकात गुरुवारी (३ सप्टेंबर) बेदम मारहाण झाल्याची घटना घडली. या घटनेचा हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय रामलाल ललवाणी यांनी तीव्र निषेध केला असून हल्लेखोरावर कठोर कारवाईची मागणी मुख्यमंत्र्यांकडे ई-मेल निवेदनाद्वारे केली आहे.

ध्वनीप्रदूषण ही गंभीर सामाजिक व पर्यावरणीय समस्या असून, त्याविरोधात भूमिका मांडणाऱ्या पर्यावरणप्रेमींवर अशा प्रकारे हल्ला होणे अत्यंत निषेधार्ह आहे, असे ललवाणी यांनी म्हटले आहे.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन श्री बापट यांच्यावर हल्ला करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच संबंधितांना तातडीने योग्य त्या कारवाईच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्हा कारागृहात ध्वज दिन उत्साहात साजरा

अहिल्यानगर : कारागृह विभागाच्या " सुधारणा व पुनर्वसन " या ब्रीद वाक्याचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने अहिल्यानगर जिल्हा कारागृह प्रशासनामार्फत बंद्यांसाठी वेळोवेळी विविध सण, उत्सव, सांस्कृतिक, सामाजिक, प्रबोधनात्मक व मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. त्यानुसार 1 सप्टेंबर रोजी कारागृह विभागाचे ध्वज दिनाचे औचित्य साधुन अहिल्यानगर जिल्हा कारागृह व आर्ट ऑफ लिव्हींग, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हा कारागृहातील बंद्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी, बंद्यांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत व्हावी आणि त्यांचे मनपरिवर्तन व्हावे, याकरीता देशभक्तीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी कारागृह अधीक्षक संतोष कवार यांनी कारागृहातील बंद्यांना गुन्हेगारी प्रवृत्तीपासून परावृत्त होणेसाठी, तसेच बंद्यांच्या मनामध्ये देशभक्ती जागृत होण्यासाठी व त्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांची अत्यंत गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमास आर्ट ऑफ लिव्हींग, अहिल्यानगरचे सुभाष गड्डम हे देखील उपस्थित होते. गायक व गिटार वादक गिरीराज जाधव, पियानोवादक नरेंद्र साळवे तसेच तबला वादक सार्थक डावरे यांनी हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. यावेळी सुमधुर देशभक्तीपर गीत तसेच भक्तीगीतांचे सादरीकरण करण्यात आले. सदर कार्यक्रमात सर्व बंद्यांनी सहभाग नोंदवत कार्यक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

जरांगे पाटील यांच्या उपोषणाला समर्थन; टापरगावात मराठा बांधवांचा दीड तास रास्ता रोको

सोलापूर–धुळे राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन; पंचक्रोशीतील मराठा समाजाची मोठी उपस्थिती

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०४ सप्टेंबर - अंतरवली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण सुरू आहे. या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी शुक्रवारी टापरगाव येथे पंचक्रोशीतील मराठा बांधवांनी सोलापूर–धुळे राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. तब्बल एक ते दीड तास चाललेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर टापरगाव व परिसरातील मराठा बांधवांनी एकत्र येत जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शविला. सकाळपासूनच आंदोलकांची महामार्गावर गर्दी होऊ लागली होती. हातात भगवे ध्वज घेत मोठ्या संख्येने मराठा बांधव रास्ता रोकोमध्ये सहभागी झाले होते.

यावेळी आंदोलकांनी मराठा आरक्षणाच्या मागणीच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. परिसरात भगवे झेंडे आणि घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. महिला, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांचाही आंदोलनात सहभाग असल्याचे दिसून आले. आंदोलनादरम्यान सोलापूर–धुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही काळ प्रभावित झाली. महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मात्र, आंदोलन शांततेच्या मार्गाने पार पडल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

आंदोलनाची माहिती मिळताच पोलिस प्रशासनाने घटनास्थळी बंदोबस्त तैनात केला होता. पोलिस अधिकारी व कर्मचारी आंदोलकांशी समन्वय साधत होते. आंदोलन शांततेत पार पडावे यासाठी पोलिस प्रशासनाने सहकार्याची भूमिका घेतली. आंदोलकांनीही पोलिस प्रशासनाला सहकार्य करत शांततेत आपला निषेध नोंदविला.

सुमारे एक ते दीड तास आंदोलन सुरू होते. त्यानंतर आंदोलकांच्या वतीने मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भातील निवेदन प्रशासनाकडे सादर करण्यात आले. निवेदनानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले आणि महामार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.

अंतरवली सराटी येथे सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला टापरगावसह पंचक्रोशीतील मराठा समाजाने एकजुटीने पाठिंबा दिल्याचे या आंदोलनातून दिसून आले. मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागावा, अशी मागणी यावेळी आंदोलकांकडून करण्यात आली.

चापानेरची पाणीपुरवठा योजना वादात; चौकशीच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

साडेचार तासांच्या चर्चेनंतर अधिकाऱ्यांचे आश्वासन; 16 सप्टेंबरपर्यंत विभागीय समितीकडून चौकशी

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०३ सप्टेंबर - मुख्यमंत्री पेयजल योजनेअंतर्गत चापानेरसह तीन ते चार गावांतील अंदाजे साडेदहा हजार नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी योजना राबविण्यात आली. मात्र, काम पूर्ण होऊनही गावांना अद्याप सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्याने योजनेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते युवराज बोरसे यांनी दि.२७ ऑगस्ट रोजी तक्रार करून योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला होता.

गावांना पाणीपुरवठा सुरळीत करावा तसेच संबंधित दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी बोरसे यांनी केली होती. मागण्यांची पूर्तता न झाल्यास दि.३ सप्टेंबर रोजी पाण्याच्या टाकीवरून उडी मारून आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी

दिला होता. त्यानुसार बुधवारी सकाळी बोरसे हे पाण्याच्या टाकीवर चढले. त्यांनी शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करत आंदोलन सुरू केल्याने परिसरात खळबळ उडाली. दरम्यान, गावकरीही आक्रमक झाल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली होती. या घटनेनंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकारी व पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तब्बल साडेचार तास अधिकारी आणि आंदोलनकर्त्यांमध्ये चर्चा सुरू होती. अखेर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांनी दि.१६ सप्टेंबरपर्यंत विभागीय स्तरावर समिती गठित करून योजनेची चौकशी करण्याचे लेखी आश्वासन दिले. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर बोरसे यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले.

यावेळी उपअभियंता बी.बी. सदावर्ते, शाखा अभियंता एस.आर. यन्नावर, सहायक पोलीस निरीक्षक एन.व्ही. गीते, बिट जमादार सुरेश शिंदे, बाळासाहेब धनुरे, अशोक मोतींगे, कृष्णा चव्हाण व हर्षवर्धन काळे यांनी चोख बंदोबस्त बजावला.

आता दि.१६ सप्टेंबरपर्यंत होणाऱ्या चौकशीकडे चापानेरसह संबंधित गावांतील साडेदहा हजार नागरिकांचे लक्ष लागले आहे. चौकशीत योजनेतील नेमक्या त्रुटी काय आहेत आणि गैरव्यवहाराच्या आरोपांमध्ये किती तथ्य आहे, हे स्पष्ट होणार आहे.

'श्यामरंग'च्या भक्तिस्वरांनी रंगले गोकुळ; गवळणींच्या सुरांनी भाविक मंत्रमुग्ध

लासूर स्टेशन : प्रतिनिधी

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त गीताबन कला महोत्सव व आमदार प्रशांत बंब मित्रमंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'श्यामरंग – गोकुळात रंगली गवळण' या भक्तिसंगीत व गवळण गीतगायनाच्या सुरेल सोहळ्याने श्रीकृष्ण कॉलनी येथील कृष्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कृष्णनामाचा गजर, भक्तिगीतांचे स्वर आणि गवळणींच्या सादरीकरणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त श्रीकृष्ण कॉलनी येथील कृष्ण मंदिरात दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या सप्ताहात भक्तिसंगीताचा विशेष कार्यक्रम आयोजित केला जातो. याच परंपरेत यंदा 'श्यामरंग' या भक्तीगीत व गवळण गीतगायनाच्या कार्यक्रमाचे दुसरे वर्ष असून, यंदाच्या सोहळ्यालाही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. श्रीकृष्णाच्या विविध भक्तिगीतांनी आणि पारंपरिक गवळणींनी उपस्थितांची मने जिंकली.

उपक्रमशील व आदर्श शिक्षक किरणकुमार पाटील यांची उल्लेखनीय शैक्षणिक वाटचाल; जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगावच्या यशात मोलाचे योगदान

(शिक्षक दिन विशेष वार्तापत्र)

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ सप्टेंबर : जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे कार्यरत असलेले किरणकुमार वसंतराव पाटील हे विद्यार्थीहिताला केंद्रस्थानी ठेवून नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविणारे उपक्रमशील व आदर्श शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे,स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन करणे,वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे तसेच शाळेच्या भौतिक विकासासाठी लोकसहभाग मिळविणे यामध्ये त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे.

त्यांच्या मार्गदर्शनातून जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगावने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

- उल्लेखनीय कामगिरी

'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' उपक्रमात द्वितीय क्रमांक : 'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा' या महत्त्वाकांक्षी उपक्रमात शाळेने तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त करून उल्लेखनीय यश मिळविले.

विज्ञान प्रदर्शनात तालुक्यात प्रथम क्रमांक : विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रयोगशीलता वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश मिळाले असून विज्ञान प्रदर्शनामध्ये शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

शिष्यवृत्ती परीक्षेत दोन विद्यार्थी पात्र : वर्ग चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या यादीमध्ये शाळेचे दोन विद्यार्थी पात्र ठरले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या मार्गदर्शनाचे हे फलित मानले जाते.

ISRO सहलीसाठी विद्यार्थीनीची निवड : ISRO सहल निवड चाचणीमध्ये शाळेच्या विद्यार्थिनीने तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवून ISRO सहलीसाठी निवड होण्याचा मान मिळविला. या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला.

परसबाग स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक : पर्यावरण संवर्धन, सेंद्रिय शेती आणि विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेमाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविलेल्या उपक्रमांतर्गत परसबाग स्पर्धेत शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.

गड-किल्ले बनवा स्पर्धेत सहभाग; मुख्यमंत्र्यांकडून गौरव : विद्यार्थ्यांमध्ये इतिहास व संस्कृतीविषयी अभिमान निर्माण व्हावा यासाठी गड-किल्ले बनवा स्पर्धेत शाळेने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उल्लेखनीय सहभागाची दखल घेत मुख्यमंत्र्यांकडून शाळेला गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

लोकसहभागातून शाळेचा विकास : शाळेच्या विकासासाठी लोकसहभागाचे महत्त्व ओळखून किरणकुमार पाटील यांनी समाजातील विविध घटकांना शाळेशी जोडले. लोकसहभागातून शाळेसाठी विविध शैक्षणिक व आवश्यक वस्तू प्राप्त करून देण्यात त्यांचा मोलाचा सहभाग राहिला

सिडकोकालीन सफाई कामगारांच्या मागण्यांसाठी कृती समितीचे निवेदन

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : सिडकोकालीन सफाई कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात सिडकोकालीन सफाई कामगार कर्मचारी कृती समितीच्या वतीने महापालिका स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांना निवेदन देण्यात आले. सफाई कामगारांच्या सेवा, वेतन तसेच प्रलंबित आर्थिक प्रश्नांबाबत तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

कृती समितीने निवेदनाद्वारे सिडकोकालीन सफाई कामगारांनी दीर्घकाळ बजावलेल्या सेवेचा विचार करून त्यांना बिनाअट व विनाशर्त महापालिका सेवेत सामावून घ्यावे, तसेच समान कामासाठी समान वेतन लागू करावे, अशी प्रमुख मागणी केली आहे.

सफाई कामगारांचे वेतन नियमानुसार नियमितपणे अदा करावे, प्रलंबित वेतन फरकाची रक्कम तत्काळ द्यावी, तसेच महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन अधिनियमांतर्गत महागाई भत्त्यात झालेल्या वाढीनुसार १ जून २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीसाठी वेतनवाढ लागू करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

याशिवाय सिडको-हडको विभागात पूर्वीपासून कार्यरत असलेल्या सिडकोकालीन सफाई कामगारांना त्यांच्या पात्रतेनुसार सफाई कामगार म्हणून विनाअट सामावून घ्यावे, तसेच सफाई कामगारांच्या वेतनातून बचत गटाच्या माध्यमातून कपात झालेल्या रकमेबाबत आवश्यक कार्यवाही करून संबंधित रक्कम कामगारांना परत मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी कृती समितीच्या सर्व मागण्या सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतल्या. संबंधित बाबींची माहिती व उपलब्ध नोंदी तपासून नियमानुसार सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

सिडकोकालीन सफाई कामगारांनी शहराच्या स्वच्छतेसाठी दीर्घकाळ महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, त्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत प्रशासनाच्या स्तरावर संबंधित विभागांकडून आवश्यक माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे मकरिये यांनी स्पष्ट केले. ही आवृत्ती मुख्य पानासाठी अधिक प्रभावी, तसेच मागण्यांना ठळकपणे अधोरेखित करणारी ठेवली आहे.

श्री 1008 चंद्रप्रभू दिगंबर जैन सवाईवाला मंदिरात उत्थापन विधी महोत्सव भक्तिभावात संपन्न

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर येथील ऐतिहासिक श्री १००८ भगवान चंद्रप्रभू सवाईवाला दिगंबर जैन मंदिरात आयोजित करण्यात आलेला उत्थापन विधी महोत्सव अत्यंत भक्तिमय वातावरणात व मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पंचामृत अभिषेक, महाशांतिधारा, शांती हवन, मूर्ती उत्थापन विधी, वेदी प्रतिष्ठा, श्री शांतिनाथ विधान, शांती होम व महाआरती अशा विविध धार्मिक विधींमध्ये हजारो भाविकांनी सहभागी होत धर्मलाभ घेतला.

या प्राचीन तीर्थक्षेत्रात एकूण २५१ जिनप्रतिमा विराजमान असून, त्यापैकी संवत ११५ मधील भगवान पार्श्वनाथांची सुमारे १९६८ वर्षे प्राचीन अतिशय प्रभावी प्रतिमा हे मंदिराचे प्रमुख आकर्षण आहे. तसेच येथे शहस्त्रकुंड आणि उलट्या स्वस्तिक चिन्हासह भगवान सुपार्श्वनाथांची दुर्मिळ प्रतिमा भाविकांच्या दर्शनासाठी विराजमान आहे. सुमारे ३५० वर्षांचा इतिहास लाभलेले हे प्राचीन जिनालय धार्मिक व ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

यूनियन बैंक ऑफ इंडिया | Union Bank of India (A Government of India Undertaking)
क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव
पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

माडेतत्वावर जागा पाहीजे

युनियन बँक ऑफ इंडियाला – यू एम एफ बी – छत्रपती संभाजीनगर शाखेकरीता क्रांति चौकाजवळ, (क्रांति चौकापासून ०५ कि.मी. परिघाच्या आत) ता. जि. छत्रपती संभाजीनगर १३०० ते १८७० स्क्रे फुट सर्व सुविधा असलेली कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. १९/०९/२०२६ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. ०४/०९/२०२६
अहिल्यानगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर

'मागेल त्याला सौर पंप' योजनेतून शेतकऱ्यांना दिवसा वीज; दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने महायुती सरकारचे महत्त्वपूर्ण पाऊल

आस्तगाव शिवारातील सौर पंपाची डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली पाहणी

राहाता (प्रतिनिधी) महाराष्ट्रामध्ये सक्षम नेतृत्व असेल तर शेतकऱ्यांच्या जीवनात कसा सकारात्मक बदल घडवून आणता येतो, याचे प्रत्यक्ष उदाहरण 'मागेल त्याला सौर पंप' योजनेच्या माध्यमातून पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांना दिवसा आणि हक्काची वीज मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेली सौर कृषी पंप योजना शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरत आहे, असे प्रतिपादन डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

राहाता तालुक्यातील आस्तगाव गावच्या शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतात बसविण्यात आलेल्या सौर पंपाच्या माध्यमातून सुरू असलेल्या सिंचनाची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी महावितरणचे अधिकारी तसेच शेतकरी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती देण्यात आली. विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून ग्रीड कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देण्यात आली. त्याचबरोबर एक पाऊल पुढे टाकत 'मागेल त्याला सौर पंप' योजना सुरू करण्यात आली. या योजनेमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध होत असून, शेतीला मोठी चालना मिळत आहे, असे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

आस्तगाव शिवारातील एका शेतकऱ्याच्या शेतात ५ एचपी क्षमतेचा सौर पंप बसविण्यात आला आहे. या पंपाच्या माध्यमातून जवळपास ५ ते १० एकर क्षेत्र ओलिताखाली आणले जात असून, शेतकऱ्याला दिवसा सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. या भागाला निळवंडे धरणाचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तत्कालीन जलसंपदा मंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे जलसंपदा मंत्री तथा राहाता मतदारसंघाचे भाग्यविधाते नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेखही डॉ. विखे पाटील यांनी केला.

पूर्वी या परिसरात दुष्काळी परिस्थितीमुळे शेती करणे अत्यंत अवघड होते. मात्र निळवंडेचे पाणी आणि सौर ऊर्जेच्या माध्यमातून उपलब्ध झालेली सिंचन व्यवस्था यामुळे आज त्याच परिसरात शेती फुलताना दिसत आहे. धरण क्षेत्रात



झालेला पाऊस, निळवंडेचे पाणी, सौर पंप योजना आणि महायुती सरकारच्या धोरणात्मक निर्णयांमुळे शेतीच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे, असे त्यांनी सांगितले.

लोडशेडिंगच्या काळात सौर पंप ठरतोय शेतकऱ्यांसाठी आधार

सध्या काही भागांमध्ये वीजपुरवठ्याच्या वेळेत होणारे बदल आणि लोडशेडिंगमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी वीज उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांना शेतात जावे लागते, तर अनियमित वीजपुरवठ्यामुळे पिकांना वेळेवर पाणी देणे अनेकदा कठीण होते. अशा परिस्थितीत 'मागेल त्याला सौर पंप' योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. सौर पंपामुळे दिवसा सौर ऊर्जेचा वापर करून शेतकरी आपल्या सोयीनुसार सिंचन करू शकतो. त्यामुळे लोडशेडिंग, रात्रीच्या वीजपुरवठ्याची प्रतीक्षा आणि वीजपुरवठ्याच्या अनिश्चिततेवर मात करून शेतीला वेळेवर पाणी देणे शक्य होत आहे. भविष्यात शेतीसाठी ऊर्जेची गरज भागविण्याच्या दृष्टीने सौर पंप हा शेतकऱ्यांसाठी प्रभावी आणि दीर्घकालीन पर्याय ठरणार आहे.

शेतकऱ्यांना सौर पंप उपलब्ध करून देण्यात महावितरणच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाचेही डॉ. विखे पाटील यांनी कौतुक केले. 'मागेल त्याला सौर पंप' योजनेची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्रात होत असून, या कामाची जागतिक स्तरावरही दखल घेतली गेल्याचे त्यांनी नमूद केले. सौर पंपाबाबत काही ठिकाणी गैरसमज आणि अफवा पसरवल्या जात आहेत. सौर पंप केवळ उन्हातच चालतो किंवा ढगाळ वातावरणात काम करत नाही, असा गैरसमज आहे. मात्र आस्तगाव येथे पाहणी केली असता पूर्णपणे ढगाळ वातावरण असतानाही सौर पंप सुरू असल्याचे दिसून आले. त्यावर स्प्रिंकलरच्या माध्यमातून शेतीला पाणी दिले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रत्यक्ष सौर पंपाचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधावा, असे आवाहन डॉ. विखे पाटील यांनी केले.

'मागेल त्याला सौर पंप' योजनेत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात शासनाकडून अनुदान मिळत आहे. ३ एचपी पंपासाठी शेतकऱ्यांना साधारण १५ ते २० हजार रुपये, तर ५ एचपी पंपासाठी साधारण ३० ते ३५ हजार रुपये भरावे लागतात. उर्वरित मोठा खर्च राज्य सरकारकडून करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. शेतकरी समृद्ध झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेची सुरुवात गाव, शेतकरी आणि शेतीच्या समृद्धीतून होते. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने सौर पंप योजनेचा लाभ घेऊन दुष्काळमुक्त आणि समृद्ध महाराष्ट्राच्या निर्मितीत सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. विखे पाटील यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महायुती सरकारचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे डॉ. विखे पाटील यांनी आभार मानले.

अग्रलेख

न्यायाने दाखविलेली 'नवी दिशा'!

गेल्या सुमारे सहा वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणाला, समाजमनाला आणि प्रसारमाध्यमांना अक्षरशः झपाटून टाकणाऱ्या दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपविण्याचा आदेश देताना मुंबई उच्च न्यायालयाने नोंदविलेली काही निरीक्षणे या संपूर्ण प्रकरणाच्या पलीकडे जाऊन न्यायाच्या एका मूलभूत तत्त्वावर बोट ठेवणारी ठरणार आहेत. केवळ आरोप झाला म्हणून कोणाला आरोपी मानता येत नाही. तपासातून पुरेसे साहित्य आणि वाजवी संशय निर्माण झाला तरच त्या दिशेने पुढे जाता येईल, असा निर्वाळा न्यायालयाने दिल्याने, वरकरणी साधी वाटणारी न्यायालयाची ही भूमिका फौजदारी न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहे. दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड परिसरातील एका उंच इमारतीवरून पडल्याने झाला. सुरुवातीचा पोलिस तपास, आत्महत्या किंवा अपघाती मृत्यूची दिशा, त्यानंतर उपस्थित झालेले प्रश्न आणि व्यक्त होणारे वेगवेगळे संशय, कुटुंबीयांनी केलेले आरोप आणि या प्रकरणाला मिळालेले प्रचंड राजकीय परिमाण यामुळे हे प्रकरण सतत चर्चेत राहिले, पण आरोप-प्रत्यारोप, संशय, शंका-कुशंका, राजकीय हितसंबंध, तपास यंत्रणांवरील प्रश्नचिन्हे आणि त्यातून निर्माण झालेला जनमताचा गदारोळ यामुळे एका तरुणीच्या मृत्यूचे सत्य शोधण्याचा मूळ प्रश्न मात्र, राजकीय आखाड्यातच काहीसा हरवून गेला. अखेर दिशाचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यांच्या याचिकेत तपासावर गंभीर आक्षेप घेण्यात आले आणि नव्याने चौकशीची मागणी करण्यात आली. या प्रकरणी प्राथमिक चौकशी अहवाल नोंदवून सखोल तपास करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने बुधवारी, २ सप्टेंबर रोजी सीबीआयला दिल्याने, गेल्या सहा वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत केवळ लोंबकळत राहिलेल्या या प्रकरणास निकालाच्या दृष्टीने एक नेमकी दिशा मिळाली, असे म्हणता येईल.

सीबीआय चौकशीच्या आदेशाबरोबरच, 'आरोपी' या शब्दाभोवती न्यायालयाने आखून दिलेली मर्यादा ही या निर्देशासोबतची आणखी एक महत्त्वाची बाबदेखील या मुंबई उच्च न्यायालयाच्या या आदेशातून स्पष्ट झाली आहे, आणि कदाचित, हादेखील या आदेशाचा एक महत्त्वाचा भाग ठरतो. प्राथमिक चौकशी अहवाल (एफआयआर) नोंदविण्याचा आदेश म्हणजे कोणत्याही व्यक्तीच्या दोषी असण्याचा निष्कर्ष नाही, त्यामुळे तपास यंत्रणांना आरोप ठेवण्याइतपत पुरेसे पुरावे हाती आल्याखेरीज कोणासही आरोपी म्हणून वागवले जाऊ नये, तसेच कोणाही निरपराध व्यक्तीस त्रास होणार नाही आणि गुन्हेगार आढळल्यास त्याला न्यायालयीन प्रक्रियेस सामोरे जावेच लागेल या दोन्ही बाबींमध्ये संतुलन राखण्याची सूचनाही न्यायालयाने केली आहे. असे संतुलन हेच फौजदारी न्यायव्यवस्थेचे प्राणतत्त्व आहे. भारतीय दंडसंहितेचे रूपांतर न्याय संहितेत झाले, तेव्हा न्यायाच्या या मूलभूत संकल्पनेचा नेमका मापदंड या प्रकरणातील न्यायालयाच्या स्पष्ट भूमिकेमुळे अधोरेखित झाला असून, प्राथमिक चौकशी अहवाल म्हणजे दोषसिद्धी हा गैरसमज पुसून टाकणारा ठरला आहे. कारण आपल्या सार्वजनिक चर्चेत याच मुद्यावरून सर्वाधिक गोंधळ होत असतो. माध्यमांमध्ये 'आरोपी' हा शब्द आला, की त्याचा सामाजिक न्यायनिवाडा आणि सामाजिक शिक्षादेखील सुरू होते. म्हणजे, अशा प्रकरणांतील न्यायालयीन खटला सुरू होण्याआधीच सार्वजनिक न्यायालयात त्याचा निकालदेखील लागलेला असतो. दिशा सालियन प्रकरणातील न्यायालयाच्या निर्देशांतून नेमके याच धोक्याकडे लक्ष वेधले गेले आहे, असे दिसते. वस्तुतः, एफआयआर हा तपासाच्या अखेरचा टप्पा नसून ती सुरुवात असते. तक्रार म्हणजे सत्याचा अंतिम पुरावा नसतो, संशय म्हणजे गुन्हा सिद्ध होणे नसते, चौकशीतील संशयित व्यक्ती म्हणजे आरोपी नसतो आणि आरोपी म्हणजे दोषी-गुन्हेगार तर मुळीच नसतो, ही जाणीव सार्वजनिक चर्चेत सहसा जाणवत नाही. केवळ गुन्हेगारास शिक्षा देणे हा न्यायव्यवस्थेचा उद्देश नसतो, तर कोणाही निरपराध व्यक्तीस शिक्षा होऊ नये याची काळजी घेणे हा या व्यवस्थेचा त्याहून मोठा उद्देश असतो. म्हणूनच दिशा सालियन प्रकरणातील न्यायालयाच्या भूमिकेकडे राजकीय चष्म्यातून पाहण्याऐवजी, न्यायव्यवस्थेच्या व्यापक तत्त्वांच्या संदर्भात पाहावयास हवे. कारण या प्रकरणाचा दुसरा महत्त्वाचा धडा तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीशीदेखील संबंधित आहे. आत्महत्या, अपघात किंवा संशयास्पद मृत्यू असा एखाद्या मृत्यूचा प्राथमिक अंदाज असेल, तर तपास यंत्रणेला उपलब्ध प्रत्येक शक्यता तपासावी लागते. सुरुवातीच्या निष्कर्षाला चिकटून राहून नंतर समोर आलेल्या विसंगतींकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. आधीच्या तपासात विसंगती असल्याचे नमूद करून उच्च न्यायालयाने याच कारणामुळे आधीच्या तपासाबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत.

कोणासही गोवले जात असल्याच्या किंवा कोणासही वाचविले जात असल्याच्या संशयापासून कोणताही तपास स्वतंत्र आणि मुक्त असला पाहिजे, त्यातून केवळ सत्य सिद्ध झाले पाहिजे हीच न्यायाची पहिली अट असते. हे तत्त्व स्वीकारले, तर देशातील अनेक तुरुंगांमध्ये गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा भोगणाऱ्या कैद्यांपेक्षा, न्यायालयीन खटला सुरू असलेल्या 'अंडरट्रायल' कैद्यांचा मुद्दा ऐरणीवर येऊ शकतो. काही माहिती स्रोतांच्या आकडेवारीनुसार, देशातील सुमारे ७० टक्के कैदी केवळ 'अंडरट्रायल' म्हणून विविध तुरुंगांत न्यायाच्या प्रतीक्षेत दिवस ढकलत आहेत. महाराष्ट्रातही परिस्थिती याहून फारशी वेगळी नाही. एखादा माणूस दोषी ठरलेला नाही, पण तो तुरुंगात आहे, त्याचा खटला सुरू आहे. सुनावणी पुढे ढकलली जाते. साक्षीदार येत नाही. सरकारी वकील बदलतो. कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत. जामिनासाठी हमीदार मिळत नाही. आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे चांगला वकील मिळत नाही आणि वर्षे सरतात. एखाद्या व्यक्तीचा गुन्हा सिद्ध होऊन त्यास शिक्षा ठोठावली गेली नाही, तरीदेखील अशा प्रकारे शिक्षा भोगावी लागत असेल, अशा व्यवस्थेलाही न्यायालयाच्या या आदेशाने एक दिशा दिली आहे. अर्थात, या आदेशामुळे सर्व अंडरट्रायल कैदी मुक्त होतील असे नाही, पण या आदेशातून निर्माण होणारे न्यायिक तत्त्व महत्त्वाचे आहे. केवळ आरोपाच्या किंवा संशयाच्या आधारावर एखाद्यास सामाजिकदृष्ट्या दोषी मानणे चुकीचे असेल, तर केवळ संशयाच्या आधारावर दीर्घकाळ एखाद्याचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या प्रक्रियेच्या कठोर न्यायिक तपासणीची गरजदेखील या निमित्ताने अधोरेखित होणार आहे. त्यामुळे, दिशा सालियन प्रकरणातील न्यायालयाचा आरोपीच्या संदर्भ संबंधित आदेश हा अचानक निर्माण झालेला नवा सिद्धांत नसून भारतीय फौजदारी न्यायव्यवस्थेत आधीपासून असलेल्या न्यायाच्या व्यापक तत्त्वाला अधिक अधोरेखित करणारा आहे, असे म्हणता येईल. एखाद्या सामान्य, गरीब आरोपीला जामीन मिळाला तरी जामिनाची रक्कम, हमीदार, कागदपत्रे आणि कायदेशीर मदत यांचा प्रश्न उभा राहतो. काही प्रकरणांमध्ये तपास लांबतो. काही प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल होण्यास विलंब होतो. आरोप निश्चित होण्यास वेळ जातो. त्यानंतर साक्षी, उलटतपासणी, न्यायालयीन तारखा आणि न्यायाची दीर्घकाळ प्रतीक्षा करत तुरुंगात रखडणारी व्यक्ती आपले कुटुंब, रोजगार, शिक्षण, प्रतिष्ठा आणि मानसिक स्थैर्य गमावत असते. गुन्हा सिद्ध होईपर्यंत कोणीही कायद्याच्या दृष्टीने दोषी नसतो, तरीही अंडरट्रायल अवस्थेत अशा व्यक्ती शिक्षा भोगतच असतात. ही विसंगती दूर करण्यासाठी न्यायालयीन निर्देश पुरेसे नाहीत. न्यायप्रक्रियेतील यंत्रणांना या त्रुटी दूर करण्याची जबाबदारी स्वीकारावी लागेल. दिशा सालियन प्रकरणी निर्देशातील ही एक सार्वत्रिक दिलासादायक बाब ठरणार असेल, तर एकूणच यंत्रणांच्या कार्यपद्धतीस नवी दिशा मिळेल आणि ते व्यापक हिताचे ठरेल, यात शंका नाही. ■

अर्थविशेष

मालमत्ता व्यवहारातील एक महत्त्वाचा प्रश्न

ॲड. हितेश पारसे

रेडी रेकनरपेक्षा कमी किमतीत मालमत्ता खरेदी-विक्री केली तर आयकराचा काय परिणाम होतो?

घर, सदनिका, भूखंड, दुकान किंवा कार्यालय खरेदी-विक्री करताना सर्वप्रथम एकच गोष्ट ठरते-मालमत्तेची किंमत किती? खरेदीदाराला मालमत्ता योग्य आणि शक्य तितक्या कमी किमतीत मिळावी असे वाटते, तर विक्रेत्याला आपल्या मालमत्तेची योग्य किंमत मिळावी अशी अपेक्षा असते. किंमत निश्चित झाल्यानंतर मुद्रांक शुल्क भरले जाते, खरेदी-विक्रीचा दस्तावेज तयार केला जातो आणि मालमत्तेची नोंदणी केली जाते. परंतु अनेकांना माहिती नसते की मालमत्तेच्या व्यवहारात खरेदीदार आणि विक्रेता यांनी परस्पर संमतीने ठरविलेली किंमत ही आयकराच्या दृष्टीने प्रत्येक वेळी अंतिम किंमत असेलच असे नाही. येथे महत्त्वाची भूमिका बजावते ती शासनाने निश्चित केलेल्या रेडी रेकनर दराची, म्हणजेच मुद्रांक शुल्कासाठी निश्चित करण्यात आलेल्या मालमत्तेच्या मूल्याची. जर मालमत्तेची प्रत्यक्ष खरेदी-विक्री किंमत आणि रेडी रेकनरनुसार निश्चित मूल्य यामध्ये मोठा फरक असेल, तर त्याचा परिणाम केवळ विक्रेत्याच्या करावरच नव्हे, तर काही परिस्थितींमध्ये खरेदीदाराच्या करावरही होऊ शकतो.

म्हणून मालमत्तेचा व्यवहार करण्यापूर्वी प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारणे आवश्यक आहे- मी ज्या किमतीत मालमत्ता विकत आहे किंवा खरेदी करीत आहे, त्या व्यवहाराचा माझ्या आयकरावर काय परिणाम होईल?

रेडी रेकनर दर म्हणजे काय? महाराष्ट्र शासनाकडून मालमत्तेच्या नोंदणीसाठी आणि मुद्रांक शुल्क निश्चित करण्यासाठी विविध भागांतील मालमत्तेचे मूल्य ठरविले जाते. यालाच सर्वसाधारणपणे रेडी रेकनर दर म्हटले जाते. मालमत्तेचा प्रत्यक्ष बाजारभाव आणि रेडी रेकनरनुसार ठरविलेले मूल्य हे नेहमी समान असेलच असे नाही. उदाहरणार्थ, एखाद्या परिसरातील सदनिकेची प्रत्यक्ष बाजारातील किंमत ८० लाख रुपये असू शकते, तर रेडी रेकनरनुसार त्याचे मूल्य ९० लाख रुपये असू शकते. मुद्रांक शुल्क आणि नोंदणीसाठी रेडी रेकनर मूल्य महत्त्वाचे असते. परंतु या मूल्याचा आयकराच्या गणनेवरही परिणाम होऊ शकतो, ही बाब अनेक नागरिकांच्या लक्षात येत नाही.

एकच व्यवहार आणि दोघांवरही कराचा परिणाम : समजा, एखादी मालमत्ता १ कोटी रुपयाला विकली जाते. मात्र, त्या मालमत्तेचे रेडी रेकनरनुसार मूल्य १ कोटी २५ लाख रुपये आहे. म्हणजे विक्रेत्याला प्रत्यक्षात १ कोटी रुपये मिळत आहेत आणि खरेदीदारही प्रत्यक्षात १ कोटी रुपये देत आहे. परंतु आयकराच्या दृष्टीने प्रश्न निर्माण होतो- या दोन्ही रकमांमधील २५ लाख रुपयांच्या फरकाचे काय? हा फरक काही परिस्थितींमध्ये विक्रेता आणि खरेदीदार या दोघांसाठीही महत्त्वाचा ठरू शकतो. विक्रेत्याच्या बाबतीत आयकर कायद्यातील कलम ५०सी महत्त्वाचे ठरते, तर खरेदीदाराच्या बाबतीत कलम ५६(२)(एक्स) विचारात घेतले जाऊ शकते.

विक्रेत्याला प्रत्यक्ष मिळालेल्या रकमेपेक्षा जास्त रकमेवर कर लागू शकतो का?

अनेकांना हे आश्चर्यकारक वाटेल, परंतु काही परिस्थितींमध्ये असे होऊ शकते. मालमत्ता विक्रेत्याच्या दृष्टीने भांडवली मालमत्ता असल्यास, तिच्या विक्रीतून होणाऱ्या भांडवली नफ्याच्या गणनेवर आयकर कायद्यातील कलम ५०सीचा परिणाम होऊ शकतो.

समजा- प्रत्यक्ष विक्री किंमत - ८० लाख रुपये; रेडी रेकनरनुसार मूल्य - १ कोटी रुपये

विक्रेत्याच्या बँक खात्यात प्रत्यक्षात ८० लाख रुपये जमा झाले आहेत. तरीही, काही परिस्थितींमध्ये आयकरासाठी विक्री मूल्य ८० लाख रुपये न मानता १ कोटी रुपये विचारात घेतले जाऊ शकते. याचा थेट परिणाम विक्रेत्याच्या भांडवली नफ्याच्या गणनेवर होतो.

हे एका उदाहरणातून समजून घेऊया : समजा, एखाद्या व्यक्तीने काही वर्षांपूर्वी मालमत्ता खरेदी केली होती आणि आता ती विकण्याचा निर्णय घेतला आहे. त्या मालमत्तेची प्रत्यक्ष विक्री किंमत ८० लाख रुपये असून रेडी रेकनरनुसार मूल्य १ कोटी रुपये आहे. जर संबंधित कायदेशीर तरतुदी लागू झाल्या आणि सुरक्षित मर्यादेचा लाभ उपलब्ध नसला, तर भांडवली नफ्याची गणना ८० लाख रुपयांऐवजी 1 कोटी रुपये हे विक्री मूल्य मानून होण्याची शक्यता असते. म्हणजेच, प्रत्यक्षात ८० लाख रुपये मिळाले असले, तरी कराच्या गणनेत १ कोटी रुपये विचारात घेतले जाऊ शकतात. परिणामी विक्रेत्याचा करपात्र भांडवली नफा वाढू शकतो. मग विक्रेत्याला किती कर भरावा लागू शकतो? याचे एकच निश्चित उत्तर देता येत नाही कारण भांडवली नफ्याची गणना अनेक बाबींवर अवलंबून असते.

उदाहरणार्थ- मालमत्ता किती वर्षांपासून मालकीची आहे?

- अल्पकालीन किंवा दीर्घकालीन भांडवली नफा लागू होतो का?
- मालमत्तेची मूळ खरेदी किंमत किती होती?
- कायद्यानुसार किंमत निर्देशांकाशी संबंधित लाभ उपलब्ध आहे का?
- मालमत्तेच्या खरेदी किंवा विक्रीसाठी झालेला खर्च किती आहे?
- नवीन घरात गुंतवणूक केल्यास उपलब्ध असलेल्या करसवलती लागू होतात का?

म्हणून प्रत्येक मालमत्ता व्यवहाराची स्वतंत्र करगणना करणे आवश्यक आहे. परंतु एक गोष्ट निश्चित आहे-रेडी रेकनरनुसार मूल्य जास्त असल्यास विक्रेत्याचा करपात्र भांडवली नफा वाढण्याची शक्यता असते.

आता खरेदीदाराच्या दृष्टीने पाहू या. सामान्यतः एखादी मालमत्ता कमी किमतीत मिळाली तर खरेदीदाराला वाटते की त्याने चांगला व्यवहार केला. परंतु आयकराच्या दृष्टीने प्रश्न निर्माण होतो- रेडी रेकनर मूल्यापेक्षा खूप कमी किमतीत मालमत्ता खरेदी केल्यास त्या फरकावर कर लागू होऊ शकतो का? काही परिस्थितींमध्ये उत्तर होय आहे.

खरेदीदारासाठी आयकराचा परिणाम :

समजा- खरेदी किंमत - ७० लाख रुपये

रेडी रेकनरनुसार मूल्य - ९० लाख रुपये

दोन्ही रकमांमधील फरक २० लाख रुपये आहे. जर हा फरक आयकर कायद्यातील निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर काही परिस्थितींमध्ये ही रक्कम खरेदीदाराच्या करपात्र उत्पन्नात समाविष्ट होऊ शकते. या प्रकारच्या उत्पन्नाचा विचार इतर स्रोतांमधून मिळालेले उत्पन्न या प्रकारात केला जाऊ शकतो. म्हणजेच, खरेदीदाराने मालमत्ता ७० लाख रुपयांना खरेदी केली असली तरी, २० लाख रुपयांचा मूल्यफरक त्याच्या उत्पन्नावर परिणाम करू शकतो. ■

(पूर्वार्ध)

वेध

पारबती... पारबती!

रेवती जोशी-अंधारे

जेन-झी सोबत संवाद साधण्यासाठी सध्या विविध क्लृप्त्या लढविल्या जात आहेत. या संवादासोबतच त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत आणि एक जबाबदार पिढी घडावी, यासाठीही विचारमंथन सुरू आहे. या सगळ्या घडामोडींमध्ये भारतीय चित्रपटसृष्टीतही बरीच धामधूम सुरू आहे. कमी बजेटचे पण जास्त कमाई करणारे, देशप्रेमाने भारलेले, अध्यात्माला मोठ्या पडद्यावर आणणारे चित्रपट जेन-झीच्या प्रेक्षकांना मल्टिप्लेक्सेसकडे खेचत आहेत. 'हनुमान अंश' नावाच्या लो बजेट चित्रपटाने कमाईचे नवीन विक्रम स्थापित केले आहेत. पण, त्यातील एका गाण्याला युवा पिढीने उचलून धरलंय. अवघ्या दोन आठवड्यांत या गाण्याला ५ मिलियन लोकांनी पाहिलं-ऐकलं. त्यापेक्षा जास्त लोकांनी हे गाणं डाऊनलोड केलं. लोकप्रियतेचे नवे उच्चांक गाठत असलेल्या या गाण्याचा वेध घेऊया!

ही पिढी पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करणारी नाही. प्रत्येक गोष्ट स्वतःच्या कसोटीवर तपासून बघणाऱ्या या पिढीला सगळं ऑथेंटिक, स्थेटिक आवडतं. मग ते सिनेमे असतील, कपडे किंवा संगीत! लोकगीतं, एतद्देशीय वाद्यं, थेट बोलीभाषांमधील गाणी त्यांना लगेच अपील करतात. याचाच परिपाक म्हणजे पारबती...पारबती हे गाणं! सध्या श्रावण महिना सुरू आहे आणि महादेव-पार्वती यांच्या विविध रूपांचे गुणगानही! बुंदेलखंडी हिंदीतील हे एक भजन आहे. मंत्रमुग्ध करणारी खास लोकगीताची लय, सोपे शब्द आणि एखाद्या गावात संध्याकाळी मंदिरातील आरतीत वाजणारी वाद्यं ही या गाण्याची विशेषता म्हणावी लागेल. साधू तिवारीने लिहिलेल्या, गायिलेल्या आणि संगीतबद्ध केलेल्या या गीत-भजनाने लोकांच्या विशेषतः नव्या पिढीच्या प्लेलिस्टमध्ये जागा पटकावली आहे.

'हनुमान अंश' हा चित्रपट निम करौली बाबांच्या जीवनावर आधारित असून, त्यातील विवाहप्रसंगी हे गीत-भजन आहे. महादेवाला वरण्यासाठी उपवास करून, घोर तपस्या करणाऱ्या पार्वतीची गोष्ट या गाण्यात आहे. तिचे तप आणि हट्ट बघून सप्तर्षी मिळून तिला समजावतात. महादेवाशी विवाहाचा हट्ट सोडून दे, तप-उपवास सोडून दे असे विनवतात. तिला महादेवाशी विवाह न करण्यासाठी अनेक तर्क देतात, असे सगळे वर्णन या गाण्यात आहे. 'काहे जिद कर रही, काहे को मर रही...' असे म्हणून सप्तर्षी पार्वतीला महादेवाला वरण्यापासून परावृत्त करतात. बुंदेलखंड म्हणजे मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील काही भाग! बुंदेली हिंदीवर दोन्ही प्रांतांतील बोलींचा प्रभाव असल्यामुळे वेगळाच गोडवा असलेली ही भाषा आहे. बुंदेली विवाहगीतं हा एक समृद्ध मौखिक वारसा आहे. समारंभांमध्ये बहार आणणाऱ्या या गाण्यांमध्ये दैनंदिन जीवनातील खेळकरपणा आणि थट्टामस्करीचा छान मिलाफ असतो. बुंदेली विवाहगीतांचा पायाच शिव-पार्वती असून या गीतांमध्ये त्यांना मंदिराच्या गाभाऱ्यातून थेट घराच्या अंगणात आणले जाते. महादेव म्हणजे अवलिया, अंगाला भस्मलेप, नंदीवर बसून आणि विचित्र वरात घेऊन आलेला वर बघून, विवाहाचा पुनर्विचार कर, अशी पार्वतीची म्हणजे वधूची थट्टा केली जाते.

बुंदेली विवाहगीतांचे दादरे-सोहरे (सुखी वैवाहिक जीवनाचा आशीर्वाद देणारी) बन्ना-बन्नी (वर-वधू पक्षाची खिल्ली उडविणारी) आणि गारी असे प्रकार आहेत. यापैकी गारी गीतांमध्ये, सामाजिक नियमांना छेद देऊन हलकीफुलकी बंडखोरी केली जाते. पारबती... हे या प्रकारात मोडणारे गीत-भजन आहे. या गाण्यांची शब्दरचना जशी सोपी तशीच त्यांच्यासोबत वाजणारी वाद्यंही सुटसुटीत! डफली, खंजेरी, नगडीया ही तालवाद्ये आणि चिकारा-एकतार्यासारखी तंतुवाद्ये या गीतांना खणखणीत नादमय बनवितात. एकूणच सामाजिक स्थिती बघता, सामान्य कुटुंबातील मुलींचे विवाह हा चिंतेचा विषय! त्यात, सोहळा पार पडण्याची काळजी वगैरे दूर करून काही क्षण गमतीत रमविणारी ही बुंदेली विवाहगीतं! साधू तिवारीने या गीतांचा, वाद्यांचा अचूक वापर करून 'पारबती...पारबती'ला जेन- झीच्या स्मार्टफोनमध्ये उतरवलं आहे. हे गीत-भजन अगदी ग्रामीण वातावरणात चित्रित केल्याचं जाणवतं. वाद्यांचा गोंगाट नाही तसे भडक अंगविक्षेपही नाहीत. पण, गीताचे बोल आणि वाद्यांचा ठेका मात्र मोहक! इतका की हे गीत-भजन लूपमध्ये टाकून ऐकावं. आपण आपली संस्कृती, भाषा, संगीत-वाद्यांची अशी नव्याने ओळख झाली तर जेन-झी सोबतच पुढच्या अल्फा आणि बीटा पिढ्यांनाही हा समृद्ध वारसा आपोआप मिळेल. सुदींग म्युझिकच्या नावाखाली एआय निर्मित संगीत ऐकण्यापेक्षा लोकगीतांची भुरळ नव्या पिढ्यांना पडावी. भजन क्लबिंगच्या ट्रेंडने याची सुरुवात झाली आहेच. 'आपलं तेच सोनं' हा विश्वास युवा पिढीत निर्माण झाला की, मैदान फत्ते! ■

९२२३७००२७७

डिजिटल जनजागृती

मुलांची माहिती आणि पालकांची जबाबदारी

सीए अभय सगदेव

एका आईने आपल्या दहा वर्षांच्या मुलासाठी शैक्षणिक अॅप डाऊनलोड केले. अॅपने मुलाचे नाव, वय, शाळेचे नाव, छायाचित्र, लोकेशन अॅक्सेस आणि नोटिफिकेशन पाठविण्याची परवानगी मागितली. काही दिवसांनी त्या मुलाला गेम्स आणि व्हिडीओ यांची जाहिरात दिसू लागली. त्या आईच्या मनात प्रश्न निर्माण झाला : माझ्या मुलाची माहिती कोण वापरत आहे, कोणत्या उद्देशासाठी वापरत आहे आणि ही माहिती सुरक्षित आहे का?

हा प्रश्न आज अधिकाधिक महत्त्वाचा होत आहे. मुले ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्म्स, गेमिंग ॲप्स, स्कूल पोर्टल्स, हेल्थ ॲप्स, डिजिटल लायब्ररीज, ॲक्टिव्हिटी क्लासेस, स्मार्ट डिव्हाईसेस आणि सोशल मीडियासारख्या सेवांचा वापर करतात. त्यांच्या वैयक्तिक माहितीमध्ये नाव, छायाचित्र, शाळेची माहिती, लर्निंग रेकॉर्ड्स, आरोग्यविषयक माहिती, लोकेशन डिटेल्स, ॲप ॲक्टिव्हिटी आणि कधीकधी बायोमेट्रिक किंवा इतर संवेदनशील स्वरूपाची माहितीही असू शकते.

डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ अर्थात डीपीडीपी ॲक्ट मुलाला डेटा प्रिंसिपलच्या विशेष गटात पाहतो. डेटा प्रिंसिपल म्हणजे ज्या व्यक्तीशी वैयक्तिक माहिती संबंधित आहे ती व्यक्ती. या कायद्यानुसार चाईल्ड म्हणजे अठरा वर्षे पूर्ण न केलेली व्यक्ती. त्यामुळे शाळा, दवाखाना, ॲप, गेमिंग प्लॅटफॉर्म किंवा ऑनलाईन स्व्हिहस मुलाची माहिती प्रक्रिया करत असेल, तर ती माहिती विशेष काळजीने हाताळली जाणे आवश्यक आहे.

कायद्याला हे मान्य आहे की मूल डिजिटल माहिती प्रक्रियेबाबत पूर्णपणे माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकत नाही. म्हणूनच, मुलाची वैयक्तिक माहिती प्रक्रिया करण्यापूर्वी डेटा फिड्युशिअरीने पॅरेंट किंवा लॉ फुल गार्डियनची व्हेरिफायेबल कन्सेंट घेणे आवश्यक आहे. डेटा फिड्युशिअरी म्हणजे वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशा प्रकारे प्रक्रिया करायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था. व्हेरिफायेबल कन्सेंट म्हणजे अशी संमती जी खरोखर पॅरेंट किंवा लॉ फुल गार्डियनकडून मिळाली आहे हे दाखवता आणि पडताळता येईल.



डीपीडीपी रुल्स, २०२५ हे अधिक स्पष्ट करतात. डेटा फिड्युशिअरीने मुलाची वैयक्तिक माहिती प्रक्रिया करण्यापूर्वी पॅरेंटची व्हेरिफायेबल कन्सेंट मिळावी यासाठी योग्य टेक्निकल आणि ऑर्गनायझेशनल मेझर्स करणे आवश्यक आहे. तसेच, स्वतःला पॅरेंट म्हणून ओळखणारी व्यक्ती खरोखर प्रौढ आहे आणि गरज पडल्यास उपलब्ध अधिकृत माहिती किंवा आयडेन्टीफिकेशन डिटेल्स यांच्या आधारे पडताळता येण्याजोगी आहे, याबाबतही ड्यू डिलिजेन्स करणे आवश्यक आहे.

याचा अर्थ असा नाही की प्रत्येक पॅरेंटला अनावश्यकपणे क्लिष्ट प्रक्रियेतून जावे लागेल. परंतु याचा अर्थ असा नक्कीच आहे की डेटा फिड्युशिअरीने मुलाने केलेला एक साधा टिक मार्क हा पॅरेंटल कन्सेंट म्हणून आंधळेपणाने स्वीकारू नये. कन्सेंट प्रक्रिया स्पष्ट, व्यवहार्य आणि गरज पडल्यास सिद्ध करता येण्याजोगी असावी. मुलांची माहिती कशी वापरली जाऊ शकते यावर कायदा कठोर मर्यादा घालतो. डेटा फिड्युशिअरीने मुलाच्या कल्याणावर प्रतिकूल परिणाम होईल अशा प्रकारे मुलाची वैयक्तिक माहिती प्रक्रिया करू नये. तसेच मुलांचे ट्रॅकिंग किंवा बिहेविअरल मॉनिटरिंग करू नये आणि मुलांना उद्देशून टार्गेटेड ॲडव्हर्टायझिंग करू नये.

एक साधे उदाहरण पाहू. शाळेला शिक्षणाशी संबंधित उद्देशांसाठी मुलाचे नाव, वर्ग, पालकांचा संपर्क क्रमांक आणि शैक्षणिक नोंदी आवश्यक असू शकतात. बालरोगतज्ज्ञाला उपचारासाठी आरोग्य नोंदी आवश्यक असू शकतात. शाळेच्या प्रवासात सुरक्षिततेसाठी ट्रान्सपोर्ट स्व्हिहसला मर्यादित लोकेशन इन्फॉर्मेशन आवश्यक असू शकते. हे उद्देश समजण्याजोगे आहेत. मात्र, याच माहितीचा वापर जाहिराती, प्रोफायलिंग किंवा अनावश्यक मॉनिटरिंगसाठी करणे वेगळा आणि धोकादायक विषय ठरू शकतो.

रुल्स मुलांच्या हितासाठी काही मर्यादित प्रोसेसिंग आवश्यक असू शकते हेही मान्य करतात. उदाहरणार्थ, हेल्थकेअर एस्टॅब्लिशमेंट आणि हेल्थकेअर प्रोफेशनल्स मुलाला आरोग्यसेवा देण्यासाठी आवश्यक असलेली माहिती प्रक्रिया करू शकतात. एज्युकेशनल इंस्टिटयुशन्स आणि चाईल्ड केअर सेंटर्स मुलाच्या सेफ्टी, अटेंडन्स, एज्युकेशन किंवा रिलेटेड ॲक्टिव्हिटीसाठी आवश्यक असलेली माहिती प्रक्रिया करू शकतात. बालकाच्या संरक्षण, वेलफेअर किंवा सेफ्टीशी संबंधित काही परिस्थितींमध्येही माहिती प्रक्रिया आवश्यक ठरू शकते.

अशा प्रकरणांमध्ये कन्सेंट आवश्यक नसू शकते; परंतु तरीही नोटीस आणि डेटा प्रोटेक्शनसंबंधी इतर सेफगार्ड्स राखणे आवश्यक असते. म्हणून पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कन्सेंट देण्यापूर्वी त्यांनी विचारले पाहिजे : कोणती माहिती गोळा केली जात आहे? ती का आवश्यक आहे? ती कोणासोबत शेअर केली जाणार आहे का? मुलाचे ट्रॅकिंग होणार आहे का? मुलाला जाहिराती दाखवल्या जाणार आहेत का? कन्सेंट कशी मागे घेता येईल? मुलाची माहिती दुरुस्त किंवा हटविण्यासाठी काय प्रक्रिया आहे?

शाळा, दवाखाने, ॲप डेव्हलपर्स आणि सर्व्हिस प्रोव्हायडर्स यांनीही हे लक्षात ठेवले पाहिजे की पॅरेंटची कन्सेंट म्हणजे मुलाच्या माहितीचा अमर्यादित वापर करण्याचा परवाना नाही. उद्देश विशिष्ट असावा, गोळा केलेली माहिती आवश्यक मर्यादेत असावी आणि मुलाची सुरक्षा व कल्याण हा केंद्रबिंदू राहिला पाहिजे. मुलांच्या माहितीचे संरक्षण ही केवळ कायदेशीर बाब नाही. ती विश्वासाची बाब आहे. मुलाच्या नावाने तयार होणाऱ्या डिजिटल फूटप्रिंटचे सर्व परिणाम मूल स्वतः समजू शकत नाही. त्यामुळे ॲडल्ट्स- पॅरेंट्स, स्कूल्स, डॉक्टर्स, प्लॅटफॉर्म्स आणि रेग्युलेटर्स यांनी अधिक जबाबदारीने वागले पाहिजे. मुलांच्या माहितीचे संरक्षण करणे म्हणजे त्यांच्या भविष्याचे संरक्षण करण्याचा एक भाग आहे.

दैनंदिन जीवनातील डीपीडीपी : शाळा पालकांना मुलाचे छायाचित्र, जन्म प्रमाणपत्र आणि वैद्यकीय माहिती ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करण्यास सांगते. प्रवेश, सुरक्षा आणि प्रशासनासाठी यातील काही माहिती आवश्यक असू शकते. तरीही पालकांना प्रत्येक माहिती का आवश्यक आहे, ती कोण पाहू शकते, ती किती काळ जतन केली जाईल आणि तिचे संरक्षण कसे केले जाईल हे समजले पाहिजे. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

वाचक पत्रे

या धर्मद्रोह्यांना थांबवा!

आजपर्यंतच्या इतिहासात कुठल्याही पिढीने इतका बेजबाबदार विरोधी पक्षनेता पाहिला नसेल. भारताच्या राजकारणात आपले महत्त्वाचे स्थान असताना अर्धवट ज्ञानाने वक्तव्य करणे याला काय म्हणायचे? या धर्मद्रोह्याने मनुस्मृतीमधील दोन ओळी उचलायच्या आणि त्यावर टीकाटिप्पणी करायची, त्याद्वारे लोकांना भ्रमित करायचे, त्यांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न करायचा. हिंदू धर्मामध्ये इतक्या चांगल्या चालीरीती, प्रथा, परंपरा असताना सोबतच त्याचासुद्धा उल्लेख करावा असे त्यांना वाटले नाही. इतर धर्माच्या चुकीच्या चालीरीती बाबतीत अो बोलण्याची हिंमत आपल्यात आहे का की तिथे आपण मूग गिळून बसता? हिंदू धर्मामध्ये म्हटले आहे जिथे नारीची पूजा होते तिथे देवतेचा वास असतो. भारतात दोन्ही नवरात्रांमध्ये मुलींची पूजा करतात हे माहिती नसणारे अज्ञानी असे वक्तव्य करू शकतात. निवडणुकीच्या काळात हिंदू म्हणून मिरवणारे आणि इतर वेळेस अहिंदू असणाऱ्या व्यक्तीला कसे कळेल? इतर धर्मीयांच्या तीन तलाक, हलाला याच्याविषयी आपण बोलून दाखवावे. वक्तव्य करताना त्या त्या धर्माचा सखोल अभ्यास करावा, एवढेही न कळणारे राजकारणी भारताची जागतिक प्रतिमा डागाळत आहेत. माझी विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की आपला नेता हा त्या पदाकरिता योग्य असायला हवा. परिवारवादाचा पुतळा नको.

डॉ. भारती अनिल हेडाऊ/यवतमाळ

■■

सोशल मीडिया आणि विद्यार्थी...

आजच्या आधुनिक युगात सोशल मीडिया हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्युब, व्हॉट्सॲप यासारख्या माध्यमांमुळे माहिती मिळवणे आणि इतरांशी संवाद साधणे सोपे झाले आहे. मात्र, सोशल मीडियाचा योग्य वापर केला तर तो उपयुक्त ठरतो, तर अति वापरामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर आणि वेळेच्या नियोजनावर परिणाम होऊ शकतो. पूर्वी विद्यार्थ्यांना माहिती मिळवण्यासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे, ग्रंथालये आणि शिक्षक यांच्यावर अवलंबून राहावे लागत असे. आज समाजमाध्यमांमुळे जगभरातील माहिती काही क्षणांत उपलब्ध होते. विविध शैक्षणिक व्हिडीओ, अभ्यासाहित्य, ऑनलाईन व्याख्याने आणि ज्ञानवर्धक कार्यक्रम यांमुळे विद्यार्थ्यांना शिकण्याच्या अनेक नवीन संधी प्राप्त झाल्या आहेत.

सोशल मीडियाचे विद्यार्थ्यांसाठी अनेक फायदे आहेत. त्याद्वारे नवीन विषयांची माहिती मिळते, शैक्षणिक व्हिडीओ पाहता येतात आणि मित्र-शिक्षकांशी अभ्यासासंबंधी संवाद साधता येतो. परंतु सोशल मीडियाचा अतिरेक टाळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी समाजमाध्यमांचा उपयोग ज्ञान, शिक्षण आणि व्यक्तिमत्त्वविकासासाठी करावा. हे विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे आणि संवादाचे प्रभावी माध्यम आहे. त्याचा योग्य वापर केल्यास शिक्षण अधिक मनोरंजक आणि सोपे होऊ शकते. मात्र, त्याचा अति वापर टाळून अभ्यासाला आणि दैनंदिन जीवनाला योग्य प्राधान्य देणे गरजेचे आहे. सोशल मीडिया चांगला किंवा वाईट नसून त्याचा वापर आपण कसा करतो हे महत्त्वाचे आहे.

श्रीकांत संभाजी मगर/९६८९११७१६९

■■

लोकमान्य टिळकांना अभिप्रेत गणेशोत्सव साजरा व्हावा

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांना अभिप्रेत असलेला गणेशोत्सव हा केवळ धार्मिक कर्मकांड किंवा मनोरंजन म्हणून नाही तर समाज प्रबोधन, देशभक्ती आणि सामाजिक ऐक्याचा एक प्रभावी उत्सव होता, मंच होता. ब्रिटिश सरकारच्या काळात भारतीय एकत्र येऊ नयेत म्हणून राजकीय सभांवर बंदी होती. अशावेळी लोकांना एकत्र आणून त्यांच्यात राष्ट्रप्रेम व राजकीय जाणिवा जागृत करण्याचे साधन सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली.

या गणेशोत्सवाच्या माध्यमातून सर्व घटकांना सामावून घेत सामाजिक एकात्मतेचा संदेश तसेच केवळ पूजाअर्चा न करता देशभक्तिपर गीते, पोवाडे, व्याख्याने आणि राष्ट्रीय विषयांवर चर्चा आयोजित केल्या जात असत, तसेच तरुणांमध्ये स्वाभिमान व स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माणचे कार्य उत्सवातून होत असे आणि गणेशोत्सवात धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक शिस्त पाळली जात होती. परंतु आजच्या गणेशोत्सवात मनोरंजनासोबत देखावा, जाहिराती, समाजकारण फक्त नावापुरते मर्यादित राहून व्यावसायिक बाबी वाढल्या आहेत. हे सर्व थांबविण्याकरिता पर्यावरणपूरक मूर्तीचा वापर, कर्णकर्कश आवाजावर नियंत्रण, वेळेचे भान, मर्यादा आणि समाजप्रबोधनाचे कार्यक्रम, सामाजिक उपक्रम यासारख्या सकारात्मक बदल आजच्या पिढीने घडवून आणल्यास आणि भक्ती, श्रद्धा, राष्ट्रप्रेम, समानता, बंधुत्व, समाजानुकूल कार्य, उपक्रमांसोबत पर्यावरणपूरक कार्यक्रम असलेला गणेशोत्सव बघायला मिळाला तरच लोकमान्यांना अभिप्रेत गणेशोत्सवाचे पावित्र्य टिकून राहील. ■

संजय श्रौती/९८६०४५१८४०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

संक्षिप्त...

LIC च्या वर्धापन दिनानिमित्ताने रक्तदान शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ४ सप्टेंबर : भारतीय जीवन बीमा निगम च्या ७० व्या वर्धापनदिनानिमिताने निलंगा येथील शाखा कार्यालयात दिनांक १ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला डखउ च्या विमेदर कर्मचारी,अधिकारी,विमा प्रतिनिधी प्रतिसाद दिला. हा रक्तदान कार्यक्रम शहरातील बीदर रस्त्यावरील धूत कॉम्प्लेक्स येथील शाखा कार्यालयात संपन्न झालारक्तदान हेच श्रेष्ठ दान हा संदेश डोळ्यासमोर ठेवून अनेक रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येत रक्तदान केले. या मोहिमेद्वारे गोळा झालेले रक्त भालचंद्र ब्लॉड बँक ,लातूर यांनी संकलन केले असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या रक्तदान शिबिरात शाखाधिकारी अनंत जोशी,शाखेतील सर्व विकास अधिकारी,विमा प्रतिनिधी ,विमाधारक, अधिकारी,कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होते..

कृषी विभागाची मोफत 'डिजिटल शेतीशाळा'

तभा वृत्तसेवा

लातूर,दि. ४ सप्टेंबर : बदलत्या हवामानात शाश्वत शेतीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्याच्या उद्देशाने कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत 'डिजिटल शेतीशाळा' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला जात आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, महिला शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी (ऋझउी) यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन लातूरच्या विभागीय कृषी सहसंचालकांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

प्रभागात स्वच्छतेसाठी ९०० कर्मचारी करणार हमला

तभा वृत्तसेवा

लातूर दि .४ सष्टेंबर : शहरात स्वच्छता करण्यासाठी मनपाच्या कर्मचाऱ्या च्या वतीने एकावेळी एकाच प्रभागात जाऊन स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून या मोहिमेमुळे शहराची स्वच्छता जलदगतीने होण्यास मदत होणार आहे

हमला या मोहिमेचा शुभारंभ मंगळवारी प्रभाग एक आणि दोन मध्ये करण्यात आला .

नियमित स्वच्छे तेअभावी शहराच्या विविध प्रभागात घाणीचे साम्राज्य पसरले असून गटारीचा उपसा लवकर होत होत नसल्यामुळे त्या गटारी तुंबल्या आहेत . त्यातून डासांची संख्या झापाट्याने डेंगू अशा आजानांना जणू हे निमंत्रण आहे . तसेच या ठिकाणी गवत वाढल्याने पण डासांची संख्या वाढण्यात मदतच होत असल्याचे चित्र असल्यामुळे याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे . तसेच प्रभागात घाणी मुळे परिसरात दुर्गंधीही पसरली आहे .

नागरिकांच्या आरोग्याच्या तक्रारी वाढत असल्यामुळे मनपा प्रशासनानी हमला काढून त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे .

मनपातील९०० स्वच्छता कर्मचारी एकाचवेळी एका प्रभागात जावून हमला मोहीम राबवित असून त्या प्रभागात स्वच्छता करत असून यात गटारीची स्वच्छता, रस्त्यांच्या कडेला असलेले गवत काढून टाकणे, रिकाम्या प्लॉट मध्ये साचलेला कचराही उचलून स्वच्छता करण्यात येत आहे . तसेच नागरिकांनी आपला कचरा कोठेही न टाकता तो घंटागाडीतच टाकून सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे .

शहरातील विविध प्रभागात अपार्टमेंट मध्ये राहणारे नागरिक मतले उतरून खाली येण्यास कंटाळा करतात . रात्री दुचाकीवरून हा कचरा रिकाम्या प्लॉटमध्ये किंवा रस्त्यांवर टाळतात . त्यामुळे त्या परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असतो . त्यामुळे हमला मोहिमेत काम करणारे कामगार अशांवर कारवाई करणार असल्यामुळे यापुढे या नागरिकांनी आपला कचरा घंटागाडीत च टाकून आपल्यावर होणारी कारवाई टाळावी असे आवाहन मनपा प्रशासना तर्फे करण्यात आले आहे

मंत्रालयातील शालेय शिक्षण विभागात 'अक्षरवाटा'ची दखल

लाल बहादूरच्या बाल लेखकांचे सांस्कृतिक धोरण समितीकडून विशेष कौतुक

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ सप्टेंबर : विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला आणि सृजनशील लेखनाला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या 'अक्षरवाटा एक नवी सुरुवात' या अभिनव उपक्रमाची मंत्रालय, मुंबई येथील शालेय शिक्षण विभागात विशेष दखल घेण्यात आली. मंत्रालयात पार पडलेल्या सांस्कृतिक धोरण समितीच्या बैठकीत लाल बहादूर शास्त्री विद्यालय, उदगीर येथील विद्यार्थ्यांच्या लेखणीतून साकारलेल्या या पुस्तकाची माहिती सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला पुस्तकाच्या माध्यमातून अभिव्यक्ती देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना, अनुभव, भावना आणि विचार लेखणीच्या माध्यमातून विविध साहित्यप्रकारांत व्यक्त केले आहेत. या सृजनशील लेखनाचे संकलन व संपादन करून 'अक्षरवाटा एक नवी सुरुवात' हे पुस्तक साकारण्यात आले आहे. जळगाव येथील अथर्व पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे संपादन विद्यालयाच्या सहशिक्षिका तथा सांस्कृतिक धोरण समितीच्या सदस्या अनिता येलमटे यांनी केले आहे.

मंत्रालयातील शालेय शिक्षण विभागात आयोजित सांस्कृतिक धोरण समितीच्या बैठकीस समिती सदस्य म्हणून उपस्थित असलेल्या अनिता येलमटे यांनी पुस्तकामागील संकल्पना, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग तसेच या उपक्रमाचा शैक्षणिक उद्देश याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांना आपल्या मनातील विचार शब्दबद्ध करण्याची संधी मिळावी आणि त्यांच्या लेखनाला व्यापक व्यासपीठ प्राप्त व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कोळगाव ग्रामसभेत २६५ घरकुल लाभार्थ्यांच्या यादीचे वाचन

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ४ सप्टेंबर : तालुक्यातील कोळगाव ग्रामपंचायतीची विशेष ग्रामसभा रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सरपंच चंद्रकांत मस्के यांच्या अध्यक्षतेखाली शांततेत व उत्स्फूर्त वातावरणात पार पडली. ग्रामसभेत घरकुल योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या तब्बल २६५ लाभार्थ्यांच्या यादीचे वाचन करण्यात आले. मोठ्या संख्येने पात्र लाभार्थी निश्चित झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

घरकुल योजनेसाठी विशेष प्रयत्न केल्याबद्दल रेणापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती ॲड. शेषराव हाके पाटील व सरपंच चंद्रकांत मस्के यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माणिक कोपणर यांची

तंटामुक्ती सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यादीत नाव समाविष्ट न झालेल्या गरजू नागरिकांकडूनही अर्ज मागविण्यात आले. पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक

कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले. ग्रामसभेस सोसायटीचे चेअरमन पंडित ठोंबरे, पोलीस पाटील महादेव पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहमदपूरात गणेशोत्सव शांतता समितीची बैठक उत्साहात

माझे मंडळ, माझी जबाबदारी' म्हणून गणेशोत्सव शांततेत साजरा करा : अरविंद रायबोले

तभा वृत्तसेवा

अहमदपूर : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, जनजागृती आणि समाजप्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. याच विधायक उद्देशाने अहमदपूर शहरातील गणेश मंडळांनी गणेशोत्सव साजरा करावा. उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच 'माझे मंडळ, माझी जबाबदारी' हा उपक्रम राबवून डीजेमुक्त मिरवणूक, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी केले.

लातूर जिल्हा पोलीस दल व प्रशासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांच्या सभागृहात आयोजित गणेशोत्सव शांतता समितीच्या बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून अरविंद रायबोले बोलत होते.

अरविंद रायबोले म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजाला एकत्र आणणारा आणि सामाजिक प्रबोधन करणारा उत्सव व्हावा. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एका व्यासपीठावर आणले. त्याच परंपरेचा वारसा पुढे नेत अहमदपूरातील गणेश मंडळांनी सामाजिक बांधिलकी जपावी. प्रत्येक मंडळाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासन व पोलीस दलाला सहकार्य करावे. डीजेचा अतिरेक टाळून शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध मिरवणुका काढाव्यात.

ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने शहरात मुस्लिम संघटनांच्या वतीने मोटारसायकल रॅली काढण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या समन्वयातून शांतता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेला प्राधान्य देत ही रॅली रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाबद्दल सोहेल कुरेशी व खलील कुरेशी यांचा उल्लेख करण्यात आला.

यावेळी गणेश मंडळांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते रमाकांत अरुणुरे, संतोष मजगे, मुकेश पाटील, उत्तम वाघमारे, मुजफ्फर देशमुख, गणेश कोदळे, मनोहर पाटील, ड. किशोर कोरे, ड. निखिल कासनाळे, बालासाहेब आगलावे तसेच मुख्य अभियंता दिनेश पाटील यांनी मनोगत व्यक्त करून विविध सूचना मांडल्या. सेवानिवृत्तीबद्दल पत्रकार राम तत्तापूरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास कार्यकारी नगरसेवक डॉक्टर सिद्धार्थ कुमार सूर्यवंशी, एपीआय संतोष केदासे, धर्मराज चावरे, संतोष निटुरे, गौरव भुसारे, साईनाथ पाटील, एपीआय श्रीनिवास राठोड, पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष संग्राम बरूरे, पोलीस पाटील उषाताई पवार, विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील, गणेश भक्त आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपनगराध्यक्ष अय्याज शेख यांनी केले. सूत्रसंचालन राम तत्तापूरे यांनी केले, तर आभार सुकेश केंद्रे यांनी मानले. अध्यक्षीय समारोप तहसीलदार उज्वलाताई पांगरकर यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहमदपूर पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'डिजिटल सेफ्टी कॅम्प' संपन्न

सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ४ सप्टेंबर : आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर झपाट्याने वाढत असतानाच, सायबर गुन्हेगारी आणि ऑनलाइन फसवणुकीचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाइन सुरक्षिततेबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी निलंगा येथील महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी येथे 'डिजिटल सेफ्टी कॅम्प' (ऊळसळींरश्र ऽरषर्शीू उराी) चे अत्यंत यशस्वी आयोजन करण्यात आले. हा महत्त्वाचा उपक्रम क्लिक हील फाऊंडेशन, पुणे यांच्या विशेष सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. या शिबिरासाठी प्रमुख वक्ते म्हणून लातूर येथील राजर्षी शाहू कॉलेजच्या विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष जाधव साहिल उपस्थित होते. त्यांच्यासोबतच विद्यार्थी परिषदेचे सचिव यश मेंढेकर आणि सह-सचिव हर्ष कारंडे यांची देखील प्रमुख उपस्थिती होती. मुख्य वक्ते श्री. जाधव साहिल यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना सध्या घडणाऱ्या सायबर फसवणुकीचे प्रकार, फिशिंग लिंक्स, आणि सोशल मीडिया अकाउंट्स सुरक्षित ठेवण्याच्या तांत्रिक पद्धती सोप्या भाषेत समजावून सांगितल्या. ते म्हणाले, डिजिटल जगात वावरताना प्रत्येक युझरने सावध राहणे गरजेचे आहे. कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी विचार करा. तर सचिव यश मेंढेकर आणि सह-सचिव हर्ष कारंडे यांनी तरुण पिढीने तंत्रज्ञानाचा वापर जबाबदारीने कसा करावा, यावर आपले विचार मांडले आणि इश ुरीश । इश ङशलीीश । इश ङरषश जपश्रळपश या त्रिसूत्रीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. महाविद्यालयीन प्रशासनाच्या पुढाकाराने संपूर्ण कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्य समन्वयक डॉ. एस. एस. पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेने पार पडला. आजच्या काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांनी अशा तांत्रिक कार्यशाळांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रा. नंदा भालके यांनी सूत्र संचालन आणि उपस्थितांचे आभार मानले. तसेच कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यक्रम समन्वयक प्रा. नंदा भालके आणि आणि प्रा. एस. व्ही. पौळकर यांनी कार्य केले. महाविद्यालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित या शिबिराला बहुसंख्येने विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी एक सुरक्षित डिजिटल भविष्य घडवण्यासाठी आणि क्लिक करण्यापूर्वी विचार करून स्वतःचे व इतरांचे सायबर गुन्ह्यांपासून रक्षण करण्यासाठी सामूहिक संकल्प केला.

बोरोळ प्रशालयाच्या शालेय समितीच्या अध्यक्षपदी सपकाळे तर उपाध्यक्ष पदी मुळखेडे

तभा वृत्तसेवा

देवणी दि. ४ सप्टेंबर : दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीत पालक सभा घेऊन सर्वानुमते अध्यक्ष म्हणून प्रशांत राजाराम सपकाळे तर उपाध्यक्ष म्हणून सौ काशीबाई ज्ञानोबा मुळखेडे यांची निवड करण्यात आली. सर्वानुमते सर्व सदस्य बिनविरोध निवडण्यात आले ही सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक महेश तांदळे व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते या समितीमध्ये शिक्षक प्रतिनिधी म्हणून यादवराव मोहनराव बालूरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शालेय समितीचे सदस्य म्हणून संतोष पंढरपुरे, श्रीकांत शेंडगे, दिपाली शेंडगे, मोहीनी भोसले, शाहु कासराळे, विजयकुमार धनाडे, सावित्रा मोहिते, शितल सुर्यवंशी, अजय मुळखेडे, अस्लम मणियार यांची निवड करण्यात आली. यावेळी गावातील तंटामुक्ती अध्यक्ष काशिनाथ शेंडगे, उपाध्यक्ष माधव बालुरे, बीट अमलदार लामतुरे सर, पत्रकार प्रताप कोयले, ग्राम पंचायत सदस्य पंढरीनाथ खुळे, दयानंद चाफे, सामाजिक कार्यकर्ते निवृत्ती सुर्यवंशी, युवा उद्योजक दत्ता हुरुचनाळे सह अदिंची उपस्थिती होती. सुत्रसंचालन सुर्यवंशी सर यांनी केले तर आभार अलमाले सर यांनी केले.

शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत अध्यक्षपदी सुरवसे, उपाध्यक्षपदी पद्मिनीताई शिंदे यांची सर्वानुमते निवड

तभा. वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३ सप्टेंबर : वांजरखेड शाळेच्या भौतिक व शैक्षणिक विकासाला चालना देण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वांजरखेडा ता. अनंतपाळ येथे शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्गठना करण्यात आली. यानिमित्त पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष सतीश सुरवसे तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक नसीर अहमद शेख यांच्या उपस्थितीत अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात समितीची पुनर्गठना करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी दिनकर सुभाषराव सुरवसे तर उपाध्यक्षपदी पद्मिनीताई सुधाकर शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

समितीमध्ये विजयाताई सुरवसे, शाहू सुरवसे, कल्पनाताई जाधव, सुजाता सूर्यवंशी, जीवन सुरवसे, सरोजा जाधव, दिपाली सुरवसे, उमाकांत सुरवसे व जनाबाई वाघ यांची पालक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समितीच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. शाळेच्या हितासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध राहून काम करू, असे आश्वासन नवनिर्वाचित समितीच्या वतीने पालकांना देण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गवरे सर, महेश बिरादार, सचिन डेंगळे यांच्यासह सर्व पालक उपस्थित होते.

विमुक्त जाती-भटक्या जमाती जनजागृतीपर शालेय उपक्रम उत्साहात

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ४ सप्टेंबर : प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, रूपचंद नगर, रेणापूर येथे विमुक्त जाती-भटक्या जमाती समाजाच्या इतिहास, संस्कृती, परंपरा व सामाजिक परिस्थितीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष शालेय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विमुक्त जाती-भटक्या जमातींच्या सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी शासनाच्या विविध योजना, शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक समानता, बंधुभाव व संविधानिक अधिकार याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी विमुक्त जाती-भटक्या जमातींचा इतिहास, त्यांच्या समस्या तसेच शिक्षणामुळे होणारा सामाजिक विकास याबाबत आपले विचार मांडले. विविध घोषवाक्ये, भाषणे व जनजागृतीपर उपक्रमातून विद्यार्थ्यांनी समाजजागृतीचा संदेश दिला.

कार्यक्रमास संस्थेच्या सचिव श्रीमती उषाताई राठोड, माध्यमिक व उच्च माध्यमिकचे प्राचार्य प्रदीप राठोड, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

स्मार्ट व इंटेलिजंट व्हीलेज जिल्हास्तरीय समितीची बैठक

कळमनुरी तालुक्यातील ११ गावांचा प्रकल्पात समावेश

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

राज्यातील निवडक जिल्ह्यांतील गावांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर 'स्मार्ट व इंटेलिजेंट व्हिलेज' प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या प्रकल्पाच्या प्रथम टप्प्यात हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील ११ गावांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये सांडस, सालेगाव, सोडेगाव, सावंगी तर्फे नांदापूर, सेलसूरा, उमरा, रामवाडी, असोलवाडी, कळमकोंडा, शेनोडा आदी गावांचा समावेश आहे.

या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गठित जिल्हास्तरीय समितीची बैठक आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झाली. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, एसजीजीएस महाविद्यालय, नांदेडचे टेक्निकल ॲकर इन्स्टिट्यूटचे अनिल गोंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) केशव गड्डापोड यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या ११ गावांचे एसजीजीएस महाविद्यालय, नांदेड येथील टेक्निकल ॲकर इन्स्टिट्यूट मार्फत गावनिहाय सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणातून ग्रामस्थांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी तसेच त्या सोडविण्यासाठी उपलब्ध तंत्रज्ञानाधारित पर्यायांचा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे. या अहवालाचे सादरीकरण अनिल गोंडे यांनी पीपीटीच्या माध्यमातून समितीसमोर केले.

यावेळी अकरा गावांमधील समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाययोजना करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कृषी, नागरी सुविधा, आपत्ती व्यवस्थापन, शिक्षण, शासन सेवा, आरोग्य आणि उपजीविका या क्षेत्रांतील अडचणी व त्यावरील तंत्रज्ञानाधारित उपाययोजनांची माहिती सादरीकरणातून देण्यात आली.

जिल्ह्यातील हा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि टेक्निकल ॲकर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक गावात निदानात्मक गरज मूल्यांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. यामाध्यमातून प्रत्येक गावाच्या स्थानिक गरजा, उपलब्ध साधनसंपत्ती आणि ग्रामस्थांच्या समस्या यांचे अचूक मूल्यांकन करून तंत्रज्ञानाच्या दृष्टीने योग्य उपाययोजना निश्चित केल्या जाणार आहेत अशी माहिती देण्यात आली.

कंजाराचा विकास करण्यासाठी गाव विकास समिती गठीत

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

महाराष्ट्र फाउंडेशन आणि उगम ग्रामीण विकास संस्थेच्या माध्यमातून कंजारा गावाच्या सर्वांगीण विकासासाठी गाव विकास समितीची स्थापना करण्यात आली. यानिमित्त जिल्हा परिषद प्रा. शा. येथे सरपंच शिलाबाई कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली गावसभा घेण्यात आली. कार्यक्रमाची पुढील दिशा व पार्श्वभूमी मांडून समिती गठित करण्यात आली.

सदरील समितीमध्ये दयानंद संभाजी कल्याणकर, संतोष नामदेव कल्याणकर, गणेशराव नागोराव कल्याणकर, सुनिता विजय पाईकराव, रामप्रसाद बाबाराव कल्याणकर यांची निवड करण्यात आली तर सहाय्यक म्हणून गणेशराव हरिभाऊ थोरात, सावित्री पंजाब कल्याणकर, ज्योती शंकरराव कल्याणकर, प्रतिमा सुनील कल्याणकर आणि सारिका मुकेश पाईकराव तर या समितीत संस्था प्रमुख म्हणून जयाजी पाईकरव यांचा समावेश असेल.

जयाजी पाईकराव यांनी मनोगत व्यक्त करतांना कंजारा माझे जन्मगांव असून गावाच्या विकास करण्यासाठी या गावाची निवड केली आहे. सदरील समितीच्या वतीने गावचा सर्वंकष आराखडा तयार केला जाणार आहे. तसेच समिती कामाची गुणवत्ता, नियंत्रण व निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रासह भारताच्या आणि जगाच्या नकाशावर आदर्श गाव म्हणून नावारूपाला यावे, यासाठी सर्व ग्रामस्थांनी एकजुटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. या कार्यासाठी महाराष्ट्र फाउंडेशनच्या माध्यमातून अमेरिकेत स्थायिक असलेल्या महाराष्ट्रातील मंडळींचे तसेच हिंगोली जिल्हा प्रशासनाचे सहकार्य लाभणार आहे. तसेच कंजारा येथील नौकरदार व व्यवसायीक भूमिपुत्र सहभागी होणार आहेत.

सहाय्यक गटविकास अधिकारी अनंता घोरपडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की शासकीय योजनांच्या मध्यमातून गावचा विकास करण्यासाठी मदत होऊ शकते यासाठी मुख्यमंत्री ग्रामसमृद्धी योजनेची माहिती दिली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण यांनी माझे गांव आरोग्य संपन्न गाव याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी विस्तार अधिकारी शेषराव आम्ले व पिंपळदरी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. पी. जी. जम्मर उपस्थित होते. या प्रक्रियेत जिल्हा परिषद प्रशासना तर्फे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गटापोड यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रमासाठी यशस्वीतेसाठी ग्रामविकास अधिकारी गजानन हनवते, आरोग्य सेविका के. एम. बर्गे, आशा कार्यकर्त्या, तसेच दिशांत पाईकराव, धनंजय पडघन, राम खंदारे, भीमराव पाईकराव, ओंकार भालेराव, दत्ता शिंदे आदी यांनी प्रयत्न केले. यावेळी महिला व पुरुष उपस्थित होते.

अखिल भारतीय गोंधळी समाज संघटनेची विभागीय बैठक

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय गोंधळी समाज संघटना मराठवाडा विभागाची बैठक ६ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे.

कोकण, पश्चिम महाराष्ट्र विभाग बैठकांनतर ०६ सप्टेंबर २६ रोजी रविवारी छत्रपती संभाजीनगर येथील संत कबीर मठ नवापुरा जुना मोंढा येथे अखिल भारतीय गोंधळी संघटना संघटना' मराठवाडा विभाग बैठक दुपारी ०२ वाजता, प्रदेश कार्यकारिणी पदाधिकारी आणि मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्ष जिल्हा पदाधिकारी यांची संयुक्त महत्त्वपूर्ण विषयावर बैठक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र अण्णाराव वनारसे यांच्या प्रमुख उपस्थितीत कमलाकर रेणुके यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे.या बैठकीत प्रमुख पाहुणे बाबासाहेब कदम, परेश गरुड, देविदास धोंगडे, शाहीर अप्पासाहेब उगले, सुरेश काळे, उल्हास काटे, रोहित राजेंद्र गायकवाड, रामदास कदम, श्रीकांत मिळेल रसाळ नितीन भिमराव तोरकडे, दत्ताजी घोगरे, तानाजी भिसे, गुंजोटी औराद, दत्ताजी पाचंगे उदगीर, रतिकांत घोगरे हे मराठवाड्यातील अखिल भारतीय गोंधळी समाज संघटनाचे सर्व जिल्हा पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

बैठकीचे व्यवस्था म्हणून आयोजक गोंधळी शाहीर रामदास धुमाळ, सहआयोजक ज्ञानेश्वर जाधव हे आहेत. या बैठकीत अखिल भारतीय गोंधळी समाज संघटनाचे लातूर, धाराशिव बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर तसेच अहिल्या नगर जिल्ह्यातील निमंत्रित पदाधिकारी यांनी बैठकीत आपल्या सोबत नियुक्त प्रमुख पदाधिकारी, निमंत्रित यांच्यासह गोंधळी समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे आवाहन जिल्हाध्यक्ष देविदास धोंगडे व जयभवानी कला मंडळाचे प्रमुख नारायण धोंगडे यांनी केले आहे.

हिंगोली– मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाला पाठींबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्यावतीने बंदचे आवाहन करण्यात आले होते. यावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस विभागाच्यावतीने चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. छाया– सुनील पाठक

संक्षिप्त वृत्त

शासकीय वसतीगृह, आधार व स्वयंम योजनेच्या प्रवेशासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

हिंगोली– इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना राबविण्यात येतात. इयत्ता १२ वी नंतर व्यावसायिक व अव्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या योजनांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यासाठी शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम प्रवेश प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी रिक्त जागांवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर १२ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत ऑनलाईन अर्ज करावा. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट तसेच आवश्यक कागदपत्रे संबंधित कार्यालयात विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्ग (इमाव), विमुक्त जाती-भटक्या जमाती (विजाभज) व विशेष मागास प्रवर्गातील (विमाप्र) विद्यार्थ्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक प्रदीप धर्माधिकारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी गृहपाल, मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह, हिंगोली यांच्याशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

एबीएम इंग्लीश हायस्कूलमध्ये कृष्णजन्माष्टमी

हिंगोली– शहरातील आरटीओ कार्यालयासमोर, औंढा रोड येथे असलेल्या एबीएम इंग्लिश हायस्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर, मुख्याध्यापक जोसेफ के. जे., उपमुख्याध्यापक आदेश बोराळकर, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत प्रमुख उपस्थितीच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. यावेळी संपूर्ण विद्यालय परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. अनेक चिमुकले विद्यार्थी राधा व श्रीकृष्णाच्या आकर्षक वेशभूषेत आले होते. त्यांच्या मनमोहक रूपाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने भक्तिगीते व विविध गीतांचे सुरेल सादरीकरण केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते दहीहंडी फोडण्याचा रोमांचक सोहळा. विद्यालयातील चार गटांनुसार दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सांघिक भावना आणि उत्साहाने दहीहंडी फोडण्यासाठी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक नितीन शिंदे यांनी प्रभावीपणे केले, तर गणेश व्यवहारे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

मनोज जरांगे यांच्या उपोषण समर्थनार्थ हिंगोली शहरात कडकडीत बंद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करून ५८ लाख नोंदी सापडलेल्यांना तत्काळ जात प्रमाणपत्रे वाटप करा या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी आंतरवली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला सात दिवस उलटले आहेत. या उपोषणाच्या समर्थनार्थ हिंगोली शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.

आंतरवली सराटी येथे मनोज जरांगे यांचे मराठा समाजाला आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू आहे. जोपर्यंत सरकार मागण्या मान्य करीत नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नाही असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. त्यांच्या उपोषणाला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात समर्थन मिळत असून वसमत येथे तिरडी यात्रा काढण्यात आली तसेच आखाडा बाळापूर, डोंगरकडा आदी ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करीत सकल मराठा समाज रस्त्यावर उतरला आहे. सकल मराठा समाजाच्यावतीने हिंगोली तालुका व शहर बंदचे दि ४ सप्टेंबर रोजी आवाहन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर येथील महात्मा गांधी चौकात सकल मराठा समाजाच्यावतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने सर्व पक्षीय पदाधिकारी व मराठा समन्वयक तसेच मराठा समाज सहभागी झाला होता. शहरातील व्यापाऱ्यांनी या बंदला प्रतिसाद देत त्यांचे व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवली होती. या बंदला हिंगोली शहरात १०० टक्के पाठींबा मिळाला.

केबल चोरी प्रकरणातील आरोपी जेरबंद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

वडद येथील निलावार यांच्या शेतामध्ये शेडसमोर ठेवलेला ४५० फुट केबल चोरून नेणाऱ्या आरोपीला हिंगोली ग्रामीण पोलिसांच्या पथकाने जेरबंद केले असून त्याच्याकडून मुद्देमाल जप्त केला आहे.

चिंचाळा येथील एकनाथ माने यांच्या फिर्यादीवरून या प्रकरणी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांना गोपनीय माहीती मिळाल्यानंतर त्यांनी लिंबाळा मक्ता येथील आरोपी शेख मतीन शेख खदील याला ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने सदरील केबल जाळून त्याच्यातील तार काढली होती. पोलिसांनी ती तार जप्त केली आहे. सदरील कारवाई पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपाधिक्षक सतीश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि विष्णुकांत गुट्टे, चव्हाण, असलम गारवे, विष्णु चव्हाण, शंकर इडोळे, सलीम पठाण यांनी केली आहे.

पांगरा शिंदे येथे भूकंपमापक केंद्र कार्यान्वित

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

हिंगोली जिल्ह्यात वारंवार जाणवत असलेल्या भूकंपाच्या धक्क्यांची अचूक नोंद घेण्यासाठी, त्या अनुषंगाने उपाययोजना करण्यासाठी पांगराशिंदे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात राष्ट्रीय भूकंपमापन विज्ञान केंद्र कार्यान्वित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रोहित कंजे यांनी दिली.

हिंगोली जिल्ह्यातील भूकंपीय हालचालींचा वैज्ञानिक अभ्यास करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राचे वरिष्ठ भूकंप शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. सिंग यांच्यात नुकतीच बैठक झाली होती. या बैठकीतील निर्णयानुसार डॉ. सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या कार्यालयीन पथकाने पांगराशिंदे येथे भूकंपमापक केंद्र सुरू केले आहे.

या केंद्रात नोंदविला जाणारा भूकंपाचा डेटा'रिअल टाइमम ध्ये नवी दिल्ली येथील राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राकडे पाठविला जाणार आहे. त्यामुळे भूकंपाची तीव्रता, केंद्रबिंदू आणि अन्य भूकंपीय बाबींचा तातडीने अंदाज घेण्यास मदत होणार आहे.

केंद्राद्वारे स्थानिक भूकंपीय हालचालींचे सातत्याने निरीक्षण करता येणार आहे. राष्ट्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने वेधशाळेसाठी उपलब्ध करून दिलेली आधुनिक यंत्रसामग्री येथे कार्यान्वित करण्यात आली आहे. हे केंद्र २४ तास कार्यरत राहणार आहे. त्यामुळे भूकंपाच्या हालचालींची माहिती तातडीने उपलब्ध होण्याची सुविधा होणार आहे. भूकंपाचे निरीक्षण, नोंदणी आणि वैज्ञानिक विश्लेषणाला चालना मिळणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील भूकंपीय हालचालींचा अभ्यास आणि त्यासंबंधी अचूक माहिती संकलित करण्यासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही श्री कंजे यांनी कळवले आहे.

रोजगार महाकुंभाअंतर्गत जिल्ह्यातील सहा ठिकाणी रोजगार मेळावे

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार व नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत 'रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र' अंतर्गत राज्यव्यापी रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन २९ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाचे सहायक आयुक्त बा.सु. मरे यांनी केले आहे.

हिंगोली जिल्ह्यात एकाच दिवशी सहा ठिकाणी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली; वराहमिहिर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळमनुरी; शककर्ता शालीवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंढा नागनाथ; बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत; तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव आणि कृषी विज्ञान केंद्र, तोंडापूर यांचा समावेश आहे.

या रोजगार महाकुंभामध्ये १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी तसेच पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता असलेल्या नोकरी इच्छुक उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी सोबत दिलेल्या ठठ कोडद्वारे किंवा लिंकवरून नावनोंदणी करावी. नोंदणी केलेल्या उमेदवारांनी आवश्यक शैक्षणिक व इतर कागदपत्रांसह प्रत्यक्ष रोजगार मेळाव्यात सहभागी होऊन उपलब्ध रोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा.

रोजगार महाकुंभाबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालय, हिंगोली येथे ०२४५६-२२४५७४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त बा.सु. मरे यांनी केले आहे.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

नोंदणी पावतीवरही एसटी प्रवासात सवलत मिळणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : प्रवाशांची गैरसोय टळणार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) तिकीट प्रणालीत १ सप्टेंबर २०२६ पासून 'एनसीएमसी' (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) अनिवार्य केल्याने सर्व्हरवर अचानक ताण आला होता. यामुळे कार्ड टॉपअप आणि रिडिंगमध्ये मोठ्या अडचणी येत होत्या. मात्र, आता 'ईबिक्स कॅश' कंपनीकडून संबंधित सॉफ्टवेअरचे नवीन व्हर्जन अपडेट करण्यात आले आहे. लवकरच ही प्रणाली पूर्णपणे सुरळीत होईल, अशी माहिती कंपनीच्या प्रतिनिधींनी दिली.

तांत्रिक बिघाडामुळे प्रवाशांना सवलतीपासून वंचित राहावे लागू नये, याची खबरदारी एसटी प्रशासनाने घेतली आहे. कार्ड हातात नसलेल्यांना ३० सप्टेंबरपर्यंत, तर कार्ड असूनही मशीन चालत नसलेल्यांना १४ सप्टेंबरपर्यंत मॅन्युअल तिकिटावर सवलत देण्यात आली आहे. या निर्णयामुळे मशीन बंद असल्याच्या कारणावरून प्रवाशांना पूर्ण तिकीट काढावे लागण्याचा मनस्ताप आणि आर्थिक नुकसान टळणार आहे.

विविध वृत्त.....

५०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर युनिक पब्लीक स्कूल येथे इयत्ता ५ वी ते १० वी च्या ५०० हून अधिक विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रामध्ये सायबर वॉरियर योगिता जाधव आणि सायबर वॉरियर प्राजक्ता बोरुळे यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल जगात सुरक्षित व जबाबदारीने वावरताना घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन केले.

सध्याच्या डिजिटल युगात विद्यार्थी मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. त्यामुळे ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, सोशल मीडिया स्कॅम आणि अनोळखी व्यक्तींकडून होणाऱ्या फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत विद्यार्थ्यांना सोप्या आणि समजण्यासारख्या पद्धतीने माहिती देण्यात आली.

सत्रादरम्यान संशयास्पद लिंक कशी ओळखावी, अनोळखी व्यक्तींशी वैयक्तिक माहिती शेअर करू नये, लोकेशन शेअर करताना घ्यावयाची काळजी, अनोळखी कॉल व संदेशांपासून सावध राहणे तसेच ऑनलाइन स्कॅमपासून बचाव यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी सत्रामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून सायबर सुरक्षेबाबत आपली उत्सुकता व्यक्त केली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सायबर स्मार्ट बना, सुरक्षित रहा ही जाणीव निर्माण करणे हा होता.

या जनजागृती सत्रामुळे ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत उपाययोजनांची माहिती मिळाली. शालेय विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

'व्हीडीएफ'मध्ये 'एआय'च्या नव्या पर्वाची सुरुवात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : विलासराव देशमुख फाउंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स, लातूर येथे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलच्या वतीने 'कृत्रिम बुद्धिमत्ता : शिक्षण आणि उद्योग सहकार्याचे नवे युग' या विषयावर सेमिनार तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता सेंटर ऑफ एक्सलन्सच्या उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास स्किल्समेट्रिक्स, पुणेचे प्रादेशिक व्यवस्थापक प्रमुख शशिकांत म्हरासळे, क्षेत्रीय व्यवस्थापक कृष्णा जायभाये आणि प्रशासकीय अधिकारी नितीन कुंडले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. महेश शिंदे, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिष्ठाता डॉ. संदीप काकडे, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेतील आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगातील वाढता वापर, रोजगाराच्या संधी आणि आवश्यक कौशल्ये याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रशिक्षण, प्रकल्प, इंटर्नशिप आणि कौशल्यविकासावर भर द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

नव्याने सुरू करण्यात आलेले कृत्रिम बुद्धिमत्ता सेंटर ऑफ एक्सलन्स विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष प्रशिक्षण, नवोपक्रम, प्रकल्पाधारित शिक्षण कौशल्यविकासाचे व्यासपीठ ठरणार आहे. आणि उद्योगाभिमुख महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

मोळवण येथे १६ किलो ८५० ग्रॅम गांजाची झाडे जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : अहमदपूर तालुक्यातील मौजे मोळवण येथे एका शेतात गांजाची झाडे लागवड केल्याचा प्रकार नांदेड येथील अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या कारवाईत उघडकीस आला आहे. या कारवाईत तब्बल १६ किलो ८५० ग्रॅम वजनाची गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून, जप्त केलेल्या गांजाची अंदाजे किंमत ८ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३ सप्टेंबर रोजी नांदेड येथील अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सला मोळवण येथील एका शेतात गांजाची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर पथकाने माहितीची खातरजमा करून शेत गट क्रमांक २५६ येथे कारवाई केली. या ठिकाणी गांजाची झाडे लागवड केलेली आढळून आल्याने पथकाने पंचनामा करून गांजाची झाडे जप्त केली आहेत.

ही कारवाई नांदेड अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे डीवायएसपी अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकातील एपीआय कोरटंलु, पीएसआय पवार, एएसआय जेकेवाड, तानाजी येळगे, सुजित बेंबडे, गणेश जाधव व मुजीफ शेख यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

या प्रकरणी राजेश्वर वाल्मीकराव कांदे, पोलीस हवालदार, नांदेड यांच्या फिर्यादीवरून संबंधित शेतमालक रामकिशन शेषेराव दहिफळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

मोळवणसारख्या ग्रामीण भागातील शेतात मोठ्या प्रमाणात गांजाची लागवड होत असताना स्थानिक किनगाव पोलिसांना याची माहिती का मिळाली नाही? असा प्रश्न आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, नांदेड येथील पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे स्थानिक पोलिसांच्या गुप्तवार्ता यंत्रणेची कार्यक्षमता आणि ग्रामीण भागातील अवैध धंद्यांवर असलेले लक्ष याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.तसेच गुप्तवार्ता देणाऱ्या नागरिकाचा किनगाव पोलिसांवर विश्वास नाही का...? असा हि प्रश्न येथील सुजान नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

किनगाव पोलीस ठाण्याचे नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांच्यासमोर अवैध धंद्यांना आळा घालण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. परिसरात अमली पदार्थांची विक्री, वाहतूक अथवा लागवड यासारख्या प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक पातळीवर अधिक प्रभावी गुप्तवार्ता यंत्रणा सक्रिय करण्याची गरज असल्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, मोळवण येथील या कारवाईमुळे अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण भागात गांजाची लागवड किंवा अमली पदार्थांचे जाळे कितपत विस्तारले आहे, याबाबतही आता पोलिसांनी सखोल तपास करावा, अशी मागणी होत आहे.

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा गौरव सोहळा

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ४ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना साखर कारखान्यांच्या माध्यमातून उसाला उच्चांकी दर मिळवून देत शेतकरी वर्गाची आर्थिक उन्नती साधण्यासाठी योगदान दिल्याबद्दल सहकारमहर्षी तथा माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांच्या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी 'गौरव सोहळा व ग्रंथ प्रकाशन सोहळा' संपन्न होणार आहे.

हा कार्यक्रम सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता, शिरूर अनंतपाळ येथील मोरया लॉन्स, कुमारस्वामी नगर येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार मंत्री मा. ना. श्री. बाबासाहेबजी पाटील राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे तसेच ग्रंथ रसिक संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार उपस्थित राहणार आहेत. या गौरव सोहळ्याचे आयोजक या नात्याने यावेळी एल. बी. आवळे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथ रसिक स्वागताध्यक्ष म्हणून, डॉ. राजकुमार बोपलकर सचिव म्हणून तसेच डॉ. जयदत्त जाधव संपादक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

गणेशोत्सव ध्वनीप्रदूषणमुक्त अन् सीसीटीव्ही युक्त पार पडणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून उत्सव शांततेत, सुरक्षित व आनंदात तर पार पडणारच पण ध्वनी प्रदूषणमुक्त व सीसीटीव्ही युक्त असणार यावर पोलीस प्रशासनाचा भर राहणार आहे. श्री गणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने लातूर शहर पोलीस व गणेश मंडळांचे पदाधिकारी यांची बैठक पार पडली. यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.

गणेशोत्सवामध्ये कर्कश आवाजात डीजे, स्पीकर अथवा ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर करू नये. ध्वनीप्रदूषणासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालय, शासन व संबंधित प्राधिकरणांनी निश्चित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे आवश्यक पालन करावे. ध्वनीक्षेपक वापरण्यासाठी परवानगी घेऊन निर्धारित वेळेत व निर्धारित ध्वनीमर्यादेतच त्याचा वापर करावा. ध्वनीप्रदूषणामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी, रुग्ण तसेच नागरिकांना त्रास होणार नाही, याची गणेश मंडळांनी विशेष दक्षता घेण्याच्या सूचना करण्यात आल्या.

यावेळी बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी समरसिंह साळवे, पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड, समाधान चवरे, संतोष पाटील तसेच गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीमध्ये गणेश मंडळाच्या अध्यक्षांनीही सूचना केल्या.

चाकूचा धाक दाखवून लुटणारा आंतरराज्यीय गुन्हेगार अटक

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ४ सप्टेंबर : चाकूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेस चाकूचा धाक दाखवून तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने चोरून नेल्याच्या गंभीर गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखा, लातूरच्या पथकाने छडा लावला आहे. या कारवाईत दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यापैकी एक आरोपी हा महाराष्ट्र, राजस्थान व गुजरात राज्यांमध्ये अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेला सराईत आंतरराज्यीय गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे. या कारवाईत चोरीतील सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरण्यात आलेला धारदार चाकू तसेच गुन्हा करून पसार होण्यासाठी वापरण्यात आलेली दुचाकी, असा एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी चाकूर पोलिस ठाणे येथे गुरनं. ४६९/२०२६, कलम ३०९ (४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास नवीन रेणापूर नाका, लातूर येथील आप्पा पान शॉपसमोर दोन इसम होंडा शाईन दुचाकीसह संशयास्पदरीत्या थांबले असल्याची माहिती मिळाली असता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचला असता दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास संशयित दोन इसम पोलिसांना मिळून आले.यावेळी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये राहूल बादल बंजारा ऊर्फ पंडितसिंग धरमसिंग जुन्नी, वय ५३ वर्षे, रा. इंदिरा कॉलनी, भादरलाऊ, जि. पाली, राजस्थान, ह.मु. शिवाजी चौक, परळी वैजनाथ, जि. बीड. बच्चनसिंग मंगलसिंग बावरी, वय ४५ वर्षे, रा. नागसेन नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपी राहुल बादल बंजारा ऊर्फ पंडितसिंग याच्या कमरेला काळ्या रंगाच्या कव्हरमध्ये ठेवलेला धारदार लोखंडी चाकू तसेच त्याच्या ताब्यात चोरीतील सोन्याचे दागिने मिळून आले. या प्रकरणी अधिक चौकशी केली असता आरोपींनी त्यांचा साथीदार जगजितसिंग अचोलसिंग दुधानी, रा. शिवाजी चौक, परळी, जि. बीड याच्या मदतीने चाकूर येथे एका महिलेस चाकूचा धाक दाखवून तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने चोरून घेतल्याची माहिती दिली. आरोपींकडून २७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने धारदार लोखंडी चाकू, होंडा कंपनीची शाईन दुचाकी क्रमांक एम.एच-२६-ए.वाय-४३४९ असा एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईतील मुख्य आरोपी राहूल बादल बंजारा ऊर्फ पंडितसिंग धरमसिंग जुन्नी याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती घेण्यात आली असता त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र, राजस्थान व गुजरात राज्यांतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. या आरोपीविरुद्ध महाराष्ट्र ६८, राजस्थान ११, गुजरात २०, कर्नाटक ०२ असे मिळून जवळपास एकशे एक गुन्हे दाखल असून राजस्थानमधील पाली, अजमेर आदी जिह्यायांतील विविध पोलिस ठाण्यांमध्ये त्याच्याविरुद्ध अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील बीड, परळी, नांदेड, परभणी, उदगीर व इतर भागांतील पोलीस ठाण्यांमध्येही त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याची शक्यता नाकारता येत नाही. ही कारवाई पोलिस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, तुराब पठाण, विनोद चलवाड, रामलिंग शिंदे, राजेश कंचे, पाराजी पुठ्ठेवाड, तुळशीराम बरुरे, गोविंद अंगद येलमटे, प्रेमदास राठोड, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, हरी पतंगे, श्रीनिवास जांभळे यांनी केली आहे.

मांजरा प्रकल्पाच्या पाण्याची आयुक्तांकडून पाहणी

अमृत योजनेतील जॅकवेलचे काम तत्काळ करण्याच्या सूचना

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : महापालिका आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी मांजरा धरणावर जाऊन पाण्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रकल्पात सुरू असलेल्या अमृत - २.० अंतर्गत लातूर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेलच्या कामास भेट दिली.

केंद्रशासन परस्कृत २५९ कोटी रुपयांच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मांजरा धरणात नवीन जॅकवेल तसेच जॅकवेल ते हरंगुळ येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत १ हजार २०० मिमी व्यासाच्या सुमारे ५० किमी लांबीच्या पाईपलाईनचे काम प्रगतीपथावर आहे. यावर्षी आतापर्यंत अत्यल्प पाऊस झाल्याने मांजरा धरणात नव्याने पाणी दाखल झाले नाही. प्रकल्पात ७० फूट खोलीचे जॅकवेलचे काम सुरू आहे. आयुक्तांनी जॅकवेलचे काम गतीने पूर्ण करण्याच्या सूचना ठेकेदाराला दिल्या. यावर्षी जॅकवेल पूर्ण केल्यास येत्या काळात टंचाई उद्भवल्यास त्याद्वारे अस्तित्वातील पाईपलाईन वापरून शहरास टंचाई कालावधीत पाणीपुरवठा करता येऊ शकेल काय, याचीही पडताळणी त्यांनी केली. कामाच्या गतीसोबतच गुणवत्ताही कायम राखण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

यावेळी आयुक्त कुलकर्णी यांनी हरंगुळ येथील जलशुद्धीकरण केंद्राचीही पाहणी केली. तेथील जलशुद्धीकरण प्रक्रियेची माहिती कार्यकारी अभियंता मंठाळे यांनी दिली. यावेळी शहरातील नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पाणीपुरवठा सुरळीतपणे मिळावा, यासाठी आवश्यक ती काळजी घेण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, कार्यकारी अभियंता शिवसागर मंठाळे, प्रकल्प व्यवस्थापक विजय चोळखणे, तांत्रिक सल्लागार इंगळे, सिद्राम हारके उपस्थित होते.

बाजार समितीच्या वतीने त्रिधारा येथे अन्नधान्य पाठवले

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर :सामाजिक बांधिलकी म्हणून प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी बाजार समिती मार्फत श्रीक्षेत्र त्रिधारा, बीड येथे वाहनाद्वारे अन्नधान्य पाठविण्यात आले. त्या वाहनाची पूजा श्रीफळ वाढवून करण्यात आली.

यावेळी बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, संचालक आंनद पवार, सुभाष घोडके, बालाप्रसाद बिदादा, प्रा. डॉ. बालाजी वाघमारे, पवन देशमुख, बळवंत पाटील, शिवाजी कांबळे, आडत असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, पदाधीकारी दिनकर मोरे, लक्ष्मी अर्बन बँकचे चेअरमन तथा व्यापारी अशोक अग्रवाल, बाजार समितीचे प्रभारी सचिव अरविंद पाटील, सहाय्यक सचिव सतीश भोसले, निरीक्षक दिपक पाटील, बाजार समितीचे कर्मचारी विनोद नखाते, राम शिंदे, व इतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

गोंद्री येथे सायबर सुरक्षा जनजागृती सत्र

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : श्री साईबाबा शुगर लिमिटेड, गोंद्री येथे सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात सायबर वॉरियर योगिता जाधव आणि सायबर वॉरियर प्राजक्ता बोरुळे यांनी उपस्थितांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

दैनंदिन जीवनात मोबाईल, इंटरनेट आणि डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर लक्षात घेता सायबर फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः आपली लोकेशन अनोळखी व्यक्तींसोबत किंवा सोशल मीडियावर शेअर करू नये, याबाबत उपस्थितांना जागरूक करण्यात आले.

तसेच संशयास्पद लिंक कशा ओळखाव्यात, अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी कोणती काळजी घ्यावी, याची माहिती देण्यात आली. बँकेच्या नावाने येणारे अनोळखी किंवा संशयास्पद कॉल, संदेश आणि ऑफर्स यापासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला जद्दल, झखछ, उतत, पासवर्ड किंवा बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती देऊ नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, त्यांची कार्यपद्धती आणि अशा घटनांपासून बचाव करण्याच्या उपाययोजनांवरही सत्रामध्ये मार्गदर्शन करण्यात आले. संशयास्पद व्यवहार किंवा सायबर फसवणूक झाल्यास तातडीने संबंधित यंत्रणेकडे तक्रार करण्याचे महत्त्वही सांगण्यात आले. भारतातील राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन १९३० असून, सायबर गुन्ह्यांची तक्रार राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर करता येते. या जनजागृतीपर सत्रामुळे उपस्थितांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली असून, सावध रहा, सुरक्षित रहा आणि सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करा असा संदेश देण्यात आला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने बंदचे आवाहन कतण्यात आले होते. मागणीसंदर्भाचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देणयात आले. यावेळी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. (छाया- नरेंद्र गडप्पा, नांदेड)

शेतकऱ्यास संचिका द्या, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे नोंदवा!

तभा वृतसेवा
बिलोली, दि. ४ सप्टेंबर -

येसगी गावाचे पुनर्वसन होऊन तब्बल ३८ वर्षे लोटली, मात्र पुनर्वसनासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप मिळालेला नसल्याने शेतकरी ड. बाबुराव देशमुख यांनी राज्य माहिती आयुक्तांकडे धाव घेतली. या प्रकरणात राज्य माहिती आयुक्तांनी संबंधित शेतकऱ्यास ३० दिवसांच्या आत विनामूल्य कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच संचिका उपलब्ध न झाल्यास जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा नोंदविण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी, नांदेड यांना देण्यात आले आहेत. या आदेशामुळे बिलोली महसूल प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली आहे.

राज्य माहिती आयुक्तांचे निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना आदेश

याबाबत अधिक माहिती अशी की, १९८३ च्या महापुरानंतर येसगी गावाचे पूर्णतः पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यासाठी जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. जमीन संपादनात अडचणी निर्माण होत असल्याने तत्कालीन आमदार कै. गंगाधरराव देशमुख कुंटूरकर यांच्या पुढाकाराने शेतकरी ड. बाबुराव शंकरराव देशमुख यांनी पुनर्वसनासाठी आपली सहा एकर जमीन शासनास देण्यास संमती दिली. त्यानंतर येसगी गावाचे पुनर्वसन करण्यात आले.

पुनर्वसनाला तब्बल ३८ वर्षे उलटूनही संबंधित जमीन मालकाला आपल्या जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. मोबदला मिळावा यासाठी ड. देशमुख यांनी देगलूर व बिलोली येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयांमध्ये अनेकदा चकरा मारल्या. तसेच तोंडी व लेखी निवेदने देऊनही त्यांच्या मागणीची दखल घेण्यात आली नाही. संबंधित जमिनीची कागदपत्रे व अवॉर्डची संचिका उपलब्ध नसल्याचे कारण सांगून प्रकरणात चालढकल करण्यात आल्याचा आरोप आहे.

शेवटी त्रस्त झालेल्या शेतकऱ्याने माहितीच्या अधिकाराखाली अर्ज दाखल केला. त्यानंतर प्रथम अपीलही करण्यात आले; मात्र अपेक्षित कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. त्यामुळे ड. बाबुराव देशमुख यांनी सन २०२४ मध्ये राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे द्वितीय अपील दाखल केले.

या अपीलावर १२ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान संबंधित शेतकऱ्यास शेतजमिनीशी संबंधित कागदपत्रे ३० दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले.

तसेच, संचिकेचा शोध घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी, बिलोली यांनी दोन कर्मचारी नियुक्त करावेत व संचिका शोधण्याच्या दैनंदिन कार्यवाहीची नोंद रोजनाम्यात करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

संचिका उपलब्ध न झाल्यास निवासी उपजिल्हाधिकारी, नांदेड यांनी अभिलेख कक्षातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ मधील कलम ९ नुसार गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

या आदेशामुळे बिलोली महसूल प्रशासनातील अनागोंदी, भोंगळ व बेजबाबदार कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. तब्बल ३८ वर्षांपासून मोबदल्याच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्याला आता तरी न्याय मिळणार का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा; बाऱ्हाळी कडकडीत बंद

तभा वृतसेवा
बाऱ्हाळी, दि. ४ सप्टेंबर -

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुकारलेल्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ शुक्रवार दि. ०४ सप्टेंबर २०२६ रोजी बाऱ्हाळी बंदची हाक देण्यात आली होती त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मराठा आरक्षणासाठी स्वतःच्या जीवाची परवा न करता मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी मध्ये पुन्हा आमरण उपोषण सुरू केले आहे. दरम्यान त्यांची तब्येत अतिशय खालावली आहे. मराठा समाज, बाऱ्हाळी ता. मुखेड च्या वतीने समर्थनार्थ शुक्रवार दि. ४ सप्टेंबर रोजी बाऱ्हाळी गाव बंदची हाक देऊन बंद पुकारण्यात आला होता त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. बंद हा शांततेत पार पडला फक्त दवाखाना व मेडिकल व अत्या अवश्यक सेवा सोडून

संपुर्ण बाजार पेठ बंद होती . मराठा समाजाच्या तरुणांनी गावातील मुख्य मार्गावरून रैली काढत नांदेड - बिदर हा राष्ट्रीय महामार्ग १६१ अ रोखुन धरला . यावेळी सकल मराठा बांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते . मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे स. पोलीस निरीक्षक राजू चव्हाण यांनी चोख बंदोवस्त ठेवला होता .

मुदखेड शहरासह बारडमध्येही कडकडीत बंद; मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा

तभा वृतसेवा
मुदखेड, दि. ४ सप्टेंबर -

मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला समर्थन दर्शवित मुदखेड तालुक्यातील व शहरातील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी मुदखेड शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले.

यावेळी सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र येत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

रास्ता रोको आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सकल मराठा समाजाच्या आंदोलनाला शहरातील नागरिकांनीही प्रतिसाद दिला.

दरम्यान, मुदखेड तालुक्यातील बारड येथेही सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यानंतर शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी बारड गावदेखील कडकडीत बंद ठेवण्यात आले.

मुदखेड शहर आणि बारड येथे झालेल्या आंदोलनातून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सम जबांधवांनी एकजूट दाखवत मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला ठाम पाठिंबा व्यक्त केला. मराठा समाजाच्या मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलनाची भूमिका कायम ठेवण्याचा निर्धार यावेळी उपस्थित समाजबांधवांनी व्यक्त केला.

यादगिरी बार परिसरातील देशी दारूच्या ग्राहकांचा नागरिक, विद्यार्थ्यांना त्रास

हदगाव -हदगाव शहरातील बस स्थानक समोरील ग्रीन पार्क कॉलनी, आरजीएस विद्यालय व भारती विद्यालय या परिसरामध्ये जाणाऱ्या एकमेव मुख्य रस्त्यावर देशी दारूच्या ग्राहकांकडून होत असलेल्या त्रासामुळे

नागरिक, महिला आणि शाळकरी विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. याप्रकरणी भारतीय जनता पक्षातर्फे प्रा.संदिप खंडेराव भुरे यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन हदगाव यांच्याकडे निवेदन देऊन कठोर कारवाईची मागणी केली आहे. शहरातील बसस्टँडसमोरील ग्रीन पार्क कॉलनी, आरजीएस आणि भारती विद्यालयात जाणाऱ्या या मुख्य रस्त्यावरून शाळांचे विद्यार्थी, कॉलनीतील महिला भगिनी व नागरिकांना सतत ये-जा करावी लागत असते या रस्त्यावरील यादगिरी बारजवळ असलेल्या देशी दारू दुकानाचे ग्राहक मद्य प्राशन करून रस्त्यावरच लघुशंका करत आहेत. मद्यपींची वाहने रस्त्यावरच उभी राहत असल्यामुळे इतर वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच रस्त्यावरून जाणाऱ्या महिलांना मद्यपींच्या विचित्र वागणुकीमुळे अतीशय परेशानी होत आहे. मद्यपींना समजवण्याचा प्रयत्न केल्यास ते नशेत भांडण करून हाणामारीची भाषा करत असल्याने भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गंभीर प्रकाराची दखल घेऊन सदर देशी दारू दुकानदारास समज देऊन मुख्य रस्त्यावर वाहने न लावण्याबाबत व लघुशंकेची इतरत्र व्यवस्था करण्याबाबत बंदोबस्त करावा, तसेच शाळकरी विद्यार्थिनी, महिला, वृद्ध नागरिक व परिसरातील नागरिकांची होणारी गैरसोय टाळावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी लताताई फाळके, जाकीर शेख, दिलीपराव, सुमित चिंचोलकर, निलेश गोरडे, रामभाऊ गोरडे, दिलीप मोकटे, दिलीप सिंग चंदेल, शाहरुख पठाण, दत्तात्रय दमकोडवार, विजय दमकुंडवार, विठ्ठल, रमेश सोनुले, पी. एम. कदम, चंपत देवसरकर, गजेंद्र शेळके, प्रवीण नरवाडे, आशिष, प्रशांत देशमुख, गजानन कल्याणकर, भाले सोमेश, विश्वनाथ हिवरकर, अंकुश ठोंबरे, रामकिशन खराडे, शिवाजी भिंगे, प्रतीक व्यवहारे, राजेश राठोड, नकुल वाघमारे, अर्चना व्यवहारे आदी उपस्थित होते.

जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ बिलोलीत कडकडीत बंद

बिलोली-मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने ४ सप्टेंबर रोजी बिलोली शहर बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला शहरातून शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. या आंदोलनात राजू पा. शिंपाळकर, बालाजी पा. शिंदे, श्रीनिवास शिंदे, दिलीप पांढरे, बालाजी सुगावे, प्रा. शंकर पवार, मारोती मालुसरे, साई रुद्रुरकर, पांडुरंग रामपूरे, साहेबराव शिंदे, अरविंद शिंदे, आनंदराव जाधव, दत्ता जाधव, संदीप धुप्पे, केदार ढगे, आनंद हिवराळे, गणेश शिंदे, हणमंत हिंगणे, चक्रधर टेकाळे, बाजीराव जाधव, देवराव शिंदे, मारोती जाधव, माधव जाधव आदींचा सहभाग होता.दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

इस्लापूरमध्ये नालीवरील फुटलेल्या स्लॅबमुळे अपघाताचा धोका

तभा वृतसेवा
इस्लापूर, दि. ४ सप्टेंबर -

येथील बाजार गल्ली ते हनुमान मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील नालीवर टाकण्यात आलेला सिमेंट काँक्रीट स्लॅब मोठ्या प्रमाणात फुटून धोकादायक अवस्थेत आला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ही परिस्थिती कायम असून, नागरिकांकडून वारंवार तोंडी माहिती देऊनही दुरुस्तीचे काम झाले नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

या मार्गावर नर्मदेश्वर महादेव मंदिर तसेच हनुमान मंदिर असल्याने दररोज मोठ्या संख्येने भाविकांची ये-जा असते. विशेषतः महिला, वयोवृद्ध तसेच लहान मुलांची या परिसरात मोठी वर्दळ असते. याच ठिकाणी लहान मुले व शाळकरी विद्यार्थी खेळत असल्याने फुटलेल्या नालीच्या स्लॅबमुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

याच रस्त्यावर हापसा असल्याने परिसरातील अनेक महिला व लहान मुले पाणी भरण्यासाठी दररोज या ठिकाणी ये-जा करतात. फुटलेल्या स्लॅबमुळे पाय घसरून नालीत पडण्याचा धोका कायम असून, एखाद्या नागरिकाला गंभीर दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यातच दर शुक्रवारी याच परिसरात साप्ताहिक बाजार भरत असल्याने परिसरातील हजारो नागरिक खरेदीसाठी इस्लापूर येथे येतात. बाजाराच्या दिवशी या मार्गावर मोठी गर्दी होत असल्याने फुटलेल्या नालीचा धोका अधिकच वाढतो. गर्दीच्या वेळी एखादा नागरिक, महिला,

वयोवृद्ध किंवा लहान मूल नालीत पडून जखमी झाल्यास मोठा अनर्थ घडण्याची शक्यता आहे.

या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालय इस्लापूर तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास अनेक वेळा हा प्रकार आणून दिला आहे. मात्र अनेक महिने उलटूनही नालीवरील फुटलेल्या स्लॅबची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने या ठिकाणी पाहणी करून फुटलेल्या स्लॅबची दुरुस्ती करावी अथवा मजबूत ठउउ नाली कव्हर स्लॅब बसवावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मंदिरातील भाविक, पाणी भरण्यासाठी येणाऱ्या महिला व मुले, शाळकरी विद्यार्थी तसेच साप्ताहिक बाजारासाठी येणारे हजारो नागरिक याच मार्गाचा वापर करीत असल्याने दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा इस्लापूरकरांकडून व्यक्त होत आहे.

सिडकोत मराठा आंदोलकडुन रॅली काढून सरकारचा निषेध; तर भाजप सरकारचे चार नगरसेवक रॅलीत सहभागी

तभा वृतसेवा
नवीन नांदेड, दि. ४ सप्टेंबर -

मराठा समाजाच्या आरक्षण व न्याय्य हक्काच्या मागण्यांसाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे सुरू केलेल्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून मराठा समाजातील युवकांनी मोटरसायकल रॅली काढून सरकारचा निषेध व्यक्त करत सिडको येथील बाजारपेठ बंद करण्यात आली. यावेळी सत्तेत असलेल्या भाजपाचे मराठा समाजातील चार नगरसेवकांचा रॅलीत सहभागी होऊन फडणवीस सरकारला घरचा आहेर दिल्याची चर्चा नागरिकांमध्ये होती.

सिडको येथील सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या जिल्हा बंदला सिडको येथून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सिडकोतील व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठान बंद करून जिल्हा बंदीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी सिडको प्रभाग क्रमांक२० चे भारतीय जनता पार्टीचे नगरसेवकासह नगरसेवक प्रतिनिधी यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या बंद आंदोलनाला पाठिंबा देऊन सत्तेत असलेल्या आपल्या सरकारला घरचा आहेर दिला असल्याची चर्चा सामान्य नागरिकांतून होत होती. यावेळी अशीही चर्चा होती की आंदोलन सहभागी होणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी आपल्या सत्तेच्या अधिकारातून मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न कायम चा मिठाला पाहिजेत होता. अशी चर्चा होती. यावेळी या बंदच्या मोटरसायक रॅलीमध्ये भाजपतील मराठा समाजाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, सतीश बसवत,

राजू लांडगे यांच्यासह काँग्रेसचे बापू पाटील, विनोद जाधव, महेश शिंदे, संकेत पाटील, गौतम पवार, दीपक भरकड, सुनील वाळके, विठ्ठल जाधव, प्रकाश घोगरे, देवराव मोरे , प्रणाम मोरे, परमेश्वर माळेगावे ,माधव कवटावाडीकर, विनायक काळे, दिनेश भरकड, गोविंद शिरशीकर, गोविंद कदम यासह शेकडो मराठा समाजातील मराठा आंदोलकांचा सहभाग असून त्यांनी मराठा समाजाच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि मराठी समाजाला ओबीसी मधूनच आरक्षण द्यावे अशा मागणीच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडे कोट पोलीस बंदोबस्त होता.

बालभारतीच्या पानावर उमटलेले नाव रमेश मुनेश्वर !

तभा वृतसेवा
किनवट, दि. ४ सप्टेंबर -

आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एकोणतीस वर्षे उपक्रम शीलपणे कार्य करणारे नांदेड जिल्ह्यातील शिक्षक रमेश यादवराव मुनेश्वर यांनी आपल्या शैक्षणिक व साहित्यिक कार्याची वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ अर्थात बालभारतीच्या इयत्ता तिसरी ते पाचवी प्रथम भाषा विषयाच्या भाषा समितीचे सदस्य म्हणून त्यांनी स्थान मिळविले आहे.

उमरीबाजार येथील रहिवासी असलेले मुनेश्वर सध्या शनिवारपेठ केंद्रांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दरसांगवी (चि.) येथे कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी माहूर

तालुक्यातील लांजी, किनवट तालुक्यातील परसरामनाईक तांडा, चिंचखेड, झेंडीगुडा व लोणी येथील शाळांमध्ये सेवा बजावली आहे. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना राज्य शिक्षक पुरस्काराने गौरविले आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप, कवीवर्य जगदीश खेबुडकर पुरस्कार आणि राज्यस्तरीय साथी नाट्य पुरस्कारानेही त्यांचा सन्मान झाला आहे.

शिक्षक दिन विशेष !

बालभारतीच्या पाठ्यपुस्तक निर्मिती प्रक्रियेत लेखी परीक्षा, मुलाखत, अनुभव व प्रतिभेच्या आधारे त्यांची निवडझाली.विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देणारे पाठ, कविता व विविध कृतींच्या निर्मितीत त्यांनी योगदान दिले आहे.

शिक्षणासोबतच 'चला, ऑक्सिजन पेरूया', 'निसर्ग शाळा', बिनभिंतीची शाळा, वृक्षदिंडी, क्षेत्रभेटी, शैक्षणिक सहली आदी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम त्यांनी राबविले. 'मी हरलो होतो पण जिंकलो..' या एकपात्री प्रयोगाला लातूर विभागातून प्रथम क्रमांक मिळाला असून 'नाऱ्याचं लगीन' या नाटिकेचे पन्नास हून अधिक प्रयोग झाले आहेत. 'क्रांतीसुर्य ' या नाटकात महात्मा ज्योतिराव फुले ची मध्यवर्ती भूमिका त्यांनी साकारली होती.

एम.ए. (मराठी), एम.ए. (शिक्षणशास्त्र), डी.एड., बी.एड., एम.एड., डी.एस.एम. आणि डिप्लोमा इन जर्नालिझम अशी शैक्षणिक वाटचाल असलेल्या मुनेश्वर यांनी साहित्य क्षेत्रातही योगदान दिले आहे. त्यांच्या कविता आकाशवाणीवरून प्रसारित झाल्या असून विविध मासिके, विशेषांक व वर्तमानपत्रांतून त्यांचे लेख, कविता, कथा व समीक्षणे प्रसिद्ध झाली आहेत. 'नवक्रांती', 'शब्दगंध' आणि 'कविता संविधानाच्या...' या प्रातिनिधिक कवितासंग्रहांचे त्यांनी संपादन केले आहे.

अध्यापन, साहित्य, कला आणि सामाजिक उपक्रमांचा समन्वय साधत आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी कार्य करणाऱ्या यादवपुत्र रमेश मुनेश्वर यांचा बालभारतीच्या पाठ्यपुस्तक निर्मिती प्रक्रियेतील सहभाग हा त्यांच्या एकोणतीस वर्षांच्या शैक्षणिक प्रवासातील निश्चितच गौरवास्पद टप्पा ठरला आहे.

जाहीर प्रगटन

(मयत रामेश्वर हरीप्रसाद बाल्दी चे वारसदार)

सर्व जनतेस जाहीर रित्या कळविण्यात येते की, अर्जदार १. शिरीष रामेश्वर बाल्दी २. पदमाबाई हरीप्रसाद बाल्दी, ३. ज्योती कैलास भुतडा, सर्व रा. कौठा ता.जि. नांदेड यांनी मौ. असदुल्लाबाद ता.जि. नांदेड गट नं. १०/१ सी. सर्वे नं. ९९८० क्षेत्र ०.२० आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६ (३) नुसार निवासी प्रयोजनासाठी भोगवटादार । मध्ये रुपांतर करणेकरीता विनंती अर्ज केलेला आहे. तेव्हा असदुल्लाबाद सि.स नं. ९९८० गट क्रं. १०/१ ही हैद्राबाद जमिन निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६ (३) नुसार निवासी प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधुन वर्ग । मध्ये रुपांतर करण्याबाबत कोणाचाही आक्षेप उजर, तक्रार, व कोर्ट केस इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदपत्रे पुराव्यासहीत आक्षेप सादर करावा. विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप उजर, तक्रार, कोर्ट इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतर प्रक्रियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप, उजर/तक्रार न्याय प्रविष्ट इत्यादी विचारात घेतली जाणार नाही.

उप जिल्हाधिकारी(महसुल)
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड